निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद प्राप्त निविदांपैकी अ.क्र. ०१ मधीन निविदाधारक श्री. रामकैलास यादव याच्या निविदातील रक्कम रु.३०,३०,३००/- हा दर इतर निविदा धारकांपैकी जास्त असुन वाजवी असल्याने दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या ३ वर्षाकरीता रक्कम रु.३०,३०,३००/- ही रक्कम मंजुर करुन व त्यावर २% आयकर स्विकारुन निविदाधारक श्री. रामकैलास यादव यांचे बरोबर संविदा करुन त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८७६

विभाग :- बांधकाम

दिनांक :१५/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' अंतर्गत गाव मौजे दिवाणमान स.नं १७६ व १७७ मध्ये सर्वधमिय दफनभुमीत विकास कामे करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिकेची एकही सर्वधर्मिय दफनभूमी अस्तित्वात नाही. काही मोजक्याच दफनभूमी पूर्वापार चर्चच्या व मुस्लिम ट्रस्टींच्या ताब्यात असून त्याचा वापर केवळ त्या परिसरातील स्थानिक नागरीकांसाठी संबंधीत ट्रस्ट कडून करुन दिला जातो. परंतू महानगरपालिका हद्दीतील इतर ठिकाणी झालेल्या नविन वस्त्यामधील रहीवाश्यांना कोणत्याही प्रकारची दफनभूमीची सोय उपलब्ध नव्हती. वसई विरार परिक्षेत्रातील सन २०११ च्या जनगणनेनुसार मुस्लिम समाजाची लोकसंख्या १,१०,३९४ व आजमितीस अंदाजे ४ लाखापर्यंत आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येस दफनभूमी नसल्यामुळे शवदफन करण्यासाठी मुंबई येथे घेऊन जावे लागते. परंतू मुंबई येथील जागा देखील कमी पडत असल्यामुळे व तेथील स्थानिकांच्या विरोधामुळे शव परत पाठविण्याचे प्रसंग उद्भवत असतात त्यामुळे अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत होता. तसेच यामध्ये शवाची अवहेलना होत होती. वसई येथील प्रोस्टेटंट (ख्रिस्ती) समाजासाठी देखील दफनभूमी नसल्यामुळे त्यांना शव घेऊन थेट केरळला जावे लागते. तसेच बेवारस शवांसाठी कोणतीही जागा उपलब्ध नसल्यामुळे पोलीस विभागातर्फे दफनभूमी जागेबाबत विचारणा होत असते. त्यामुळे सन २००७ पासून सर्वधर्मीय दफनभूमी करीता तत्कालीन नगरपरिषद काळापासून विविध आंदोलने, मोर्चे, विधानसभा प्रश्न, अल्पसंख्याक आयोगाच्या बैठका झाल्या होत्या. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ६ कलम महानगरपालिकेने तरतूद करावयाच्या बाबी उपकलम ११ अन्वये प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठेवणे, त्या बदलणे व त्यांचे नियमन करणे आणि उक्त प्रयोजनासांठी नवीन जागांची तरतूद करणे व बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावणे इत्यादी कर्तव्ये महानगरपालिकेने करावयाचे नमूद आहे. त्यामुळे नागरीकांना दफनभूमीची सोय करणे हे महानगरपालिकेचे आवश्यककर्तव्य आहे दरम्यान विविध धार्मिय नागरिकांना वरील प्रमाणे शव दफनासाठी अडचणीचा सामना करावा लागत असल्यामुळे नागरिक महानगरपालिकेस दफनभूमी उपलब्ध करुन देणेसाठी वारंवार विचारणा करीत होते. त्यामुळे दफनभूमीचा प्रश्न दिवसेंदिवस संवेदनशील बनत होता.

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे दिवाणमान येथील स. नं. १७६ व १७७ मध्ये वसई विरार विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. ५९४A B.G चे आरक्षण दाखविण्यात आले होते. सदर आरक्षणाखालील जागा ही राज्य शासनाच्या मालकीची आहे. सदर जागा मा. जिल्हाधिकारी ह्यांचे पत्र क्र. महसुल/क१/टे-९/एलएनडी आगाऊ ताबा ४/२०११ अन्वये दि. २०/०८/२०११ रोजी आरक्षणाखालील जागा B.G. च्या विकासासाठी महानगरपालिकेस ताब्यात दिली.(पृष्ठ क्र.५५)ते ५८

परंतू सदर जागेवरील आरक्षण EP मध्ये असल्यामुळे वापर सुरु करता आला नाही. शासनाच्या दि. ०४/०४/२०१२ च्या आदेशान्वये Site no ५९४ A या EP ला मान्यता देण्यात आली. (पृष्ठ क्र.७९ते९३)वसई विरार विकास योजनेमध्ये १३ ठिकाणी B.G दफनभूमीसाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत. परंतू सदर जागा ह्या मॅनग्रोव्हज, डोंगराळ खडकाळ भाग व स्थानिकांचा विरोध लक्षात घेता विकसीत करता येत नव्हत्या.

मौजे दिवाणमान स. नं. १७६/१७७ येथील जागा ही वसई तालूक्याच्या मध्यवर्ती भागात आहे तसेच त्यावर B.G चे आरक्षण अस्तित्वात होते . तथापी सदर स. नं. १७६/१७७ B.G. चे आरक्षण असलेल्या जमीनीवर नागरीकांनी उघड्या जागी दफन करण्याची सुरवात केली असती तर सार्व. आरोग्याचा व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असता. करीता व्यापक सार्वजनिक हित लक्षात घेऊन महानगरपालिकेने स. नं. १७६/१७७ मध्ये B.G. आरक्षण जागेवर प्रत्यक्ष कार्यवाही करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

सन २०१३ पासून दफनभूमीचे काम सुरु करण्यात आले होते. परंतू सन २०१६ मध्ये नागरिक सुनिल मुळे ह्यांनी पुणे येथे राष्ट्रीय हरित लवाद येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार मा. लवादाच्या २४ ऑक्टोबरच्या सन २०१६ च्या आदेशानुसार आवारभिंत पाडण्यात आली आहे. (पृष्ठ क्र.९५)ते ९६

तद्नंतर महापालिका हद्दीतील मौजे राजावली येथे नविन वस्तीत रहावयास आलेले लाल खान या इसमाचा मृत्यू झाला होता. परंतु दफनविधीसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे सदर मयत व्यक्तीच्या मुलांने व इतर नागरीकांनी स. नं. १७६/१७७ दफनभूमीच्या जागेत दफनविधी केला. त्यामुळे माणिकपूर पो. स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे.

सदर जागा ही वेटलॅन्डने बाधीत असल्याने मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई येथे जा.क्र.वविशम/बांध/का.अ/१८-१९ दि. ०२/०३/२०१९ च्या पत्रान्वये दफनभुमी वापरासाठी अनुमती मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला होता. (पृष्ठ क्र७७) वेटलँड २०१९/प्रक्र.२५६/ता क्र.१ पर्यावरण विभाग दि. ०९ सप्टेंबर २०१९ रोजी वेटलँड नसलेबाबत मंजूरी मिळाली आहे. (पृष्ठ क्र.)

राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार MCZMA ची परवानगी घेवून दफनभुमीचा वापर करण्यात यावा असे आदेश देण्यात आला आहे. (पृष्ठ क्र.९५) त्यानुसार महानगरपालिकेने ३ नोव्हेंबर २०१७ रोजी पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे परवानगी साठी अर्ज दाखल केला होता. (पृष्ठ क्र.९९) दिनांक २४ मे २०१९ बैठक क्र. १३४ विषय क्र. २ ने मंजूरी मिळालेली आहे. (पृष्ठ क्र. ७५)

सर्वधर्मिय दफनभुमी सुरु करणेबाबत नागरीकांची निवेदने प्राप्त झालेली आहेत. (पृ.क्र. १ ते ३३ त्यानुसार दफनभुमी विकासाचे काम करण्यासाठी मा.कार्यकारी अभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करणेबाबत सुचना केलेली आहे.

सदर दफन दफनभुमी मध्ये सर्वधार्मियांना सर्वसाधारण ठराव क्र. २१ दि. १८/०६/२०१६ ने जागा विभागातुन देण्यात आली आहे. परंतु दफनभुमी, स्मशानभुमीमध्ये टॉयलेट, वॉचमॅन कॅबीन, पाण्याची टाकी असणे आवश्यक आहे. सदर जागेमधील ख्रिश्चन, सुन्नी मुस्लीम, हयांना दिलेल्या जागेमध्ये शौचालय वॉचमन केबीन, शोकसभा शेड, बांधकाम करावयाचे आहे. त्यास मंजुरी मिळावी.

सदर जागेवर प्रत्यक्ष पाहणी करुन अंदाज पत्रक तयार करणेत आले आहे. अंदाजपत्रकात आवार भिंत, विट बांधकाम, कॉलम बीमचा समावेश आहे. तसेच ४ सीट शौचालय, वॉचमन कॅबीन ६.०० मी X ६.०० मी, भुमिगत पाण्याची टाकी, शोकसभा शेड ३०.०० मी X ५.०० मी अंतर्गत पार्टीशन, डांबरीकरण रस्ता २५० मी X ७.०० मी मातीभराव २ फुट उंच समावेश करणेत आला आहे. कामाची रक्कम रु. १,७५,२६,३६४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात तयार आले आहे.

सबब उपरोक्त नमुद ठिकाणी मौजे दिवाणमान स.नं. १७६ व १७७ मध्ये दफनभुमीच्या जागेवर विकास कामे करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने सदर कामी होणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' अंतर्गत गाव मौजे दिवाणमान स.नं १७६ व १७७ मध्ये सर्वधमिय दफनभुमीत ख्रिश्चन, सुन्नी मुस्लीम, हयांना दिलेल्या जागेमध्ये शौचालय, वॉचमन केबीन, ~~शोकसभा शेड~~, बांधकाम करणेस मंजुरी देणेत येत आहे.
सदर कामी तयार केलेल्या रु. १,७५,२६,३६४/- अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तांत्रिक मंजुरी घेऊन निविदा प्रसिद्ध करण्यात यावी.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 877 विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 15/12/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई -विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात उद्भवणाऱ्या पुर परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याच्या अनुषंगाने होल्डींग पॉण्ड विकसीत करणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये वसई -विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२३ व सद्याची २४ लक्ष इतकी लोकसंख्या झाली आहे. ३११ चौरस कि.मी. इतके विस्तारीत महापालिका क्षेत्र असून या भागाचा नागरीकरणाचा वेग जास्त आहे. महापालिका क्षेत्र डोंगरी, नागरी व सागरी भागात विस्थापीलेले आहे. समुद्र सपाटीपासून सदरचे क्षेत्र सर्वसाधारणत: ३.६ मीटर इतके असून जून ते सप्टेंबर या दरम्यान एकुण ४००० मी.मी. सरासरी पावसाची नोंद होत आहे.

वसई-विरार उप प्रदेशात पावसाळ्यात पुर्व पट्ट्यातील डोंगराळ भागातून येणारे पावसाचे पाणी नाल्यांमार्फत खाडी व पुढे समुद्रास मिळते. याच दरम्यान शहरात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्यास व समुद्रात भरती असल्याने शहरातील विविध सखल भागात ३ ते ४ फुट पुराचे पाणी साचून जनजिवन विस्कळीत होत आहे. यावर शहराचा भौगोलीक अभ्यास करून दिर्घ कालीन उपाययोजना तयार करण्यासाठी नीरी व आय.आय.टी., मुंबई या संस्थांची नेमणुक करण्यात आली व त्यांनी या क्षेत्राचा सखोल अभ्यास करून लघु व दिर्घ कालीन उपाययोजना / कामे हाती घेण्याबाबत सविस्तर अहवाल महापालिकेस सादर केला आहे. सदर अहवालात त्यांनी महापालिकेने आरक्षीत होल्डींग पॉण्ड विकसीत करण्याचे अभिप्राय नोंदविले आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात दोन ठिकाणी होल्डींग पॉण्डची आरक्षणे असून त्यापैकी एक गाव निळेमोरे येथे एकूण ५,७२,४०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या जागेवर होल्डींग पॉण्डसाठी आरक्षण आहे. सदर एकूण आरक्षीत जागेपैकी खालील प्रमाणे जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

अ.क्र.	गाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ	आरक्षण
१	निळेमोरे	१९५	१ व २	३०८२६०.०० चौ.मी.	होल्डींग पॉण्ड
२	निळेमोरे	१७९	१ ड	३०५३६.०४ चौ.मी.	होल्डींग पॉण्ड
३	निळेमोरे	२१८	१	३१०५.१९ चौ.मी.	होल्डींग पॉण्ड
			एकूण क्षेत्रफळ	३४१९०१.२३ चौ.मी.	

दि.१३/१२/२०२१ च्या आढावा बैठकीत मा.आयुक्त यांनी महापालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या होल्डींग पॉण्डच्या जागा विकसीत करण्यासाठी येणारा मोठ्या

प्रमाणावरील खर्च विचारात घेऊन सदर होल्डींग पॉण्डची जागा खाजगी व्यक्ती /संस्था/ विकासक/ ठेकेदार यांचेकडून स्व:खर्चाने खोदाई करून घेण्यासाठी **स्वारस्याची अभिरुची (EOI)** मागविण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदर काम EOI तत्वावर करण्यासाठी खालील प्रमाणे अटी - शर्ती ठेवणे आवश्यक असल्याचे या कार्यालयाचे मत आहे.

१. खाजगी संस्था/ व्यक्ती यांनी उपरोक्त नमुद भागात स्व: खर्चाने खोदाई करावयाची आहे.

२. खोदाईसाठी एकूण क्षेत्रफळ x १.५ मीटर (खोली ५ फुट) इतके खोदकाम करावयाचे आहे.

३. याकामी खोदाई करण्यात येणाऱ्या मातीचे स्वामीत्वधन (रॉयल्टी) महसूल खात्याकडे भरणा करणे आवश्यक राहील.

४. खोदाई करणेपूर्वी योग्य ती पूर्व परवानगी महसूल विभागाकडून घेणे बंधनकारक राहील.

५. वरील कामापोटी महापालिका कोणताही मोबदला संबंधीतास अदा करणार नाही.

६. सदर खोदाई केलेली मातीची विल्हेवाट मुदतीत लावणे संबंधीतावर बंधनकारक राहील.

७. संबंधीत संस्था/ व्यक्ती/ विकासक/ ठेकेदार यांच्याकडे खोदाई करीता लागणारी वाहने उदा. JCB, डंपर, मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

८. सदर काम करताना कोणताही अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास संबंधीत संस्था/ व्यक्ती जबाबदार राहील. महापालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

९. माती /गाळ/ चिखल वाहतूक करताना रस्त्यावर अस्ताव्यस्त पाडणार/ पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच वाहतुक करताना माती /गाळ/ चिखल रस्त्यांवर पडल्यास / पसरल्यास सदर रस्ता स्वखर्चाने स्वच्छ करण्याची जबाबदारी संबंधीताची राहील.

१०. खोदाईकरून पॉन्ड तयार करावा लागेल त्याच्या चारही बाजूने मातीचा बांध/ रिंगबंड तयार करण्याची जबाबदारी संबंधीतावर राहील. तसेच पॉण्डचे क्षेत्रफळ मोठे असल्याने महापालिका अभियंत्यांच्या सल्यानुसार पॉण्डच्या मध्यभागात Excess Bund तयार करणे आवश्यक राहिल.

११. सदर पॉण्ड खोदतेवेळी सदर जागेत जाण्या-येण्यासाठी पोच रस्ता तयार करणे व काम झाल्यानंतर पुन:श्च रस्ता लेव्हल करणे हि जबाबदारी संबंधीताची राहील.

१२. सदर काम उप अभियंता, प्रभाग समिती "ए" व उप अभियंता, प्रभाग समिती "ई" यांच्या नियंत्रणाखाली करणे आवश्यक राहील.

वरील प्रमाणे अटी-शर्ती अंतर्भुत करून विषयांकीत कामी स्वारस्याची अभिरूची (EOI) मागविण्यास तसेच याकामी प्राप्त होणाऱ्या ईच्छुक संस्था/ व्यक्ती/

विकासक/ ठेकेदार यांचे अभीरूचीचे अर्ज मंजूर करून त्यांना होल्डींग पॉण्ड क्षेत्रात खोदाई कामी परवानगी देण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी गाव निळेमोरे येथील महापालिकेच्या मालकीच्या होल्डींग पॉण्डसाठी आरक्षीत जागेत ईच्छुकांकडून स्वारस्याची अभिरूची EOI मागविण्यास व सदर कामास मा. आयुक्त यांच्या प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :-

१. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात उद्भवणाऱ्या पुर परिस्थितीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने नेमणूक केलेल्या नीरी व आय.आय.टी. या संस्थांनी त्यांच्या अहवालात आरक्षीत होल्डींग पॉण्ड विकसीत करण्याचे अभिप्राय नोंदविले आहेत.

२. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात गाव निळेमोरे सर्व्हे क्र. १९५ हि.नं. १ व २, सर्व्हे नं. १७९ हि.नं. १ ड व सर्व्हे नं. २१८ हि.नं. १ एकूण क्षेत्र ३४१९०१.२३ चौ.मी. या क्षेत्रफळाच्या जागेवर होल्डींग पॉण्डचे आरक्षण असून सदरची जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली आहे.

३. सदर ठिकाणी होल्डींग पॉण्ड विकसीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येणार असल्याने सदर होल्डींग पॉण्ड च्या ठिकाणी खोदाई करून मातीची विल्हेवाट स्व:खर्चाने लावण्यासाठी खाजगी संस्था/ व्यक्ती/ विकासक/ ठेकेदार यांचेकडून स्वारस्याची अभिरूची मागवून काम करून घेतल्यास महापालिकेच्या खर्चाची बचत होणार आहे.

४. गाव निळेमोरे सर्व्हे क्र. १९५ हि.नं. १ व २, सर्व्हे नं. १७९ हि.नं. १ ड व सर्व्हे नं.२१८ हि.नं. १ एकूण क्षेत्र ३४१९०१.२३ चौ.मी. या क्षेत्रफळाच्या जागेवर होल्डींग पॉण्ड खोदाईसाठी व त्यातून निघणारी मातीची विल्हेवाट लावण्यासाठी स्वारस्याची अभिरुची मागविण्यास व सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. प्राप्त होणाऱ्या पात्र स्वारस्य अभिरुची अर्जांवर कार्यवाही करून खाजगी संस्था/ व्यक्ती/ विकासक/ ठेकेदार यांना प्रस्तावात नमुद अटी-शर्ती नुसार परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

349/4

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ८७८ विभाग : सार्व.बांधकाम

दिनांक :३५/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ९४ मधील जगदगुरु शंकराचार्य मंदीराजवळ सांस्कृतिक भवन बांधणे.

प्रशासकिय मान्यता :- मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १२ दि. २०/०६/२०१९ अन्वये मंजूरी.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ६७,२३,८४१/-

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता दि.०५/०३/२०१९

जाहिर निविदा सुचना :-
१) दै. लोकसत्ता दि. २४/०८/२०१९
२) दै. फ्रि प्रेस जर्नल दि. २४/०८/२०१९
३) दै. पुर्णविराम दि. २४/०८/२०१९

जाहिर प्रथम फेर निविदा सुचना :-
१) दै. नवराष्ट्र दि. २६/०२/२०२१
२) दै. वृत्तमानस दि. २६/०२/२०२१
३) दै. प्रात:काल दि. २६/०२/२०२१
४) दै. नवभारत दि. २६/०२/२०२१
५) दै. मिड-डे दि. २६/०२/२०२१
६) दै. फ्रि प्रेस जर्नल दि. २६/०२/२०२१
७) दै. हिंदमाता मिरर दि. २६/०२/२०२१

जाहिर द्वितीय फेर निविदा सुचना :-
१) दै. स्टॅण्डर्ड पोस्ट दि. ०९/०६/२०२१
२) दै. नवभारत दि. ०९/०६/२०२१
३) दै. नव महाराष्ट्र दि. ०९/०६/२०२१
४) दै. वृत्तमानस दि. ०९/०६२०२१
५) दै. जागरुक टाईम्स दि.०९/०६/२०२१

६) दै. फ्रि प्रेस जर्नल दि. ०९/०६/२०२१
७) दै. पुर्णविराम दि. ०९/०६/२०२१

ई निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. १९/०७/२०२१ दु. ३.०१ मि.

प्राप्त निविदांची संख्या : - ०३

द्वितीय लखोटा उघडण्याची दिनांक :- दि. २१/१०/२०२१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदाधारकांचे नाव	निविदा दर
१.	मे. बाबा कंन्स्ट्रक्शन	१५.२०% कमी दराने
२.	मे. श्री. सदगुरु कंन्स्ट्रक्शन	१०.००% कमी दराने
३.	मे. कल्पतरु एंटरप्रायजेस	२.११% कमी दराने

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचे अभ्यास करता **मे. बाबा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२०% कमी दराची** निविदा प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराने आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. बाबा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२०% कमी दराची** निविदा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी **मे. बाबा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२०% कमी दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क)/(ड) नुसार शिफारस मिळणेबाबत निविदा समितीसमोर सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ९४ मधील जगदगुरु शंकराचार्य मंदीराजवळ सांस्कृतिक भवन बांधणेकामी **मे. बाबा कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२०% कमी दराची**

३५५/५

निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.२०% कमी दराच्या** निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ८७९ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-७५/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहनाचे वाहनाचे दुरुस्ती करीता स्पेअरपार्ट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र - आचोळे येथे वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहन क्रमांक एम.एच. ४८ सी- ८१०१ कार्यरत आहे. महानगरापलिका हद्दीमध्ये व हद्दी बाहेर कोणत्याही घटनास्थळी आग व रेस्क्यु वर्दी मिळताच आपल्या महानगरपालिका अग्निशमन विभागाचे कर्मचारी अग्निशमन वाहनासह त्वरीत घटनास्थळी पोहचतात. परंतु सदर वाहनामध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वाहन नादुरुस्त आहे असे संदर्भिय अर्जान्वये वाहनचालक यांनी कळविले आहे.

वाहनाचे दुरुस्ती कामे करण्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका परिसरात नाही. सदर वाहनाची चॅसिस मान कंपनी कडून खरेदी केले असून वाहनाचे फॅब्रिकेशनचे काम मे. हायटेक सर्व्हिसेस यांचेकडून करण्यात आले आहे. तरी सदर वाहनांसाठी लागणारे स्पेअरपार्ट मे. हायटेक सर्व्हिसेस यांचेकडे उपलब्ध होतात. अग्निशमन वाहनांचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका मे. के.एल.इंटरप्रायजेस यांना देण्यात आला आहे परंतु सदर वाहनावर अत्याधुनिक यंत्रणा असल्यामुळे वाहनांस लागणारे काही स्पेअरपार्ट मे. के.एल. इंटरप्रायजेस यांचेकडे उपलब्ध नाहीत.

त्यामुळे वाहनचालकाचे प्राप्त अहवालानूसार अग्निशमन विभागाकडिल वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहनाची तपासणी मे. हायटेक सर्व्हिसेस या मुळ उत्पादक कंपनीकडून दिनांक २७/०९/२०२१ रोजी पाहणी केली असता सदर कंपनीने खालील स्पेअरपार्ट मागविणे आवश्यक असले बाबत दरपत्रक सादर केले आहे.

1) Tower Light
2) Limit Switch
3) Blinking Light
4) Break Light
5) Back Side Indicator
6) Shutter Switch
7) Remote Battery
8) Head Light
9) Man Gear Leaver
10) Side Indicator
11) Service Charges for per Visit

त्यानुसार उपरोक्त स्पेअरपार्ट खरेदी करणे करीता रक्कम रु. ७३,३९६/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील खर्च सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका मधील पान नं. ३१ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** मध्ये तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहनाची उपरोक्त दुरुस्ती कामे महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार मे. हायटेक सर्व्हिसेस यांचे कडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७३,३९६/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- अग्निशमन विभागातील वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहन कार्यरत असून या वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट भारतातील अधिकृत विक्रेते मे. हायटेक सर्व्हिसेस,पुणे यांचे व्यतिरिक्त कोठेही उपलब्ध होत नसल्यामुळे लागणारे स्पेअरपार्ट हे मुळ कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून उपलब्ध करावे लागणार आहेत व त्यांनी साहित्याच्या दराबाबत प्रोफॉर्मा इनव्हाईस दिले आहे. प्रोफॉर्मा इनव्हाईस मधील दराप्रमाणे वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर वाहनास लागणारे साहित्य अधिकृत विक्रेते मे. हायटेक सर्व्हिसेस यांचेकडून महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार विना निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७३,३९६/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

18/12

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ८८०

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :- १५/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता फोम टेंडर, मिनी वॉटर टेंडर व वॉटर टेंडर वाहने खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व), वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया औद्योगिक वसाहती असुन आग लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असतात तसेच महानगरपालिका हद्दीमधुन मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग जात असुन मोठया प्रमाणात वाहनाची वर्दळ असते. वाहन अपघात किंवा वायु / रसायन गळतीच्या दुर्घटना घडल्यास अग्निशमन विभागाकडे सद्या एक नग फोम टेंडर वाहन कार्यरत आहे. तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक सामुग्रीला आग लागल्यास आणखी एक नग फोम टेंडर अग्निशमन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच म्हाडाकडून एक मिनी वॉटर टेंडर खरेदी करणे बाबत अनुदान प्राप्त झाले आहे.

अग्निशमन दलातील सद्या वापरात असलेले अग्निशमन वाहने १) एम.एच.०४.ए.एम.०२२३ (वॉटर टेंडर), (सन २००६) २) एच.०४.एच.८०६० (वॉटर टेंडर), (सन २००८) ३) एम. एच. ४ एच ८०५९ (वॉटर टेंडर) (सन १९९६) या वाहनांचे शासन धोरणा नुसार आयुष्यमान संपत आलेले आहे त्यामुळे या वाहनाऐवजी तीन नग वॉटर टेंडर टाईप "बी" अग्निशमन वाहने साहित्यासह खरेदी करणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे फोम टेंडर, मिनी वॉटर टेंडर व वॉटर टेंडर टाईप बी या वाहनांचे कोटेशन मागविले असता खालील प्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.

अ. क्र.	वाहनांचा तपशील	चॅसिस किंमत	फॅब्रिकेशन किंमत	एक वाहनाची रक्कम	खरेदीची संख्या	वाहनांची अंदाजित एकुण रक्कम
१	फोम टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	२२,५३,०००/-	२,६८,३२,४००/-	२,९०,८५,४००/-	१	२,९०,८५,४००/-
२	मिनी वॉटर टेंडर (यंत्रसामुग्रीसह)	१७,८३,४००/-	१,०६,९७,७००/-	१,२४,८१,१००/-	१	१,२४,८१,१००/-
३	वॉटर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	२२,५३,०००/-	१,२५,६९,८००/-	१,४८,२२,८००/-	३	४,४४,६८,४००/-
					एकुण	८,६०,३४,९००/-

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास महानगरपालिकेस उपरोक्त वाहने खरेदी करणे आवश्यक असुन त्याकरिता रक्कम रुपये ८,६०,३४,९००/-/- खर्च अपेक्षित आहे.

सदरची वाहने खरेदी करणे करीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित अर्थसंकल्प २०२०-२०२१ सह सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. ५७ वरील ०८ नंबरचे लेखाशिर्ष **"विकास निधीअंतर्गत अग्निशमन वाहन व अग्निशमन यंत्रणा असलेली मोटारसायकल व उंच शिडीसह इतर साहित्य खरेदी"** यामध्ये रक्कम रुपये ४० कोटी तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन विभागासाठी उपरोक्त अग्निशमन वाहने खरेदी करणेस येणा-या अंदाजित रक्कम रु. ८,६०,३४,९००/- खर्चास महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रस्तावीत केल्यानुसार वसई - विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगताचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता -

१. फोम टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - १ नग
२. मिनी वॉटर (अत्याधुनिक यंत्रसामग्रीसह) - १ नग
३. वॉटर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामग्रीसह) - ३ नग

इत्यादी अद्ययावत अग्निशमन वाहने खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रुपये ८,६०,३४,९००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४४। **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : १६ /१२/ 2021

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) हद्दीतील वॉर्ड क्र. 58 मधील न्यू फिश मार्केटच्या पहिल्या मजल्यावर वाढीव बांधकाम करणे काम रद्द करून इसारा रक्कम व डी.डी. द्वारे भरण्यात आलेली परफॉर्मन्स रक्कम परत मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर

उपरोक्त विषयानुसार वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) हद्दीतील वॉर्ड क्र. ५८ मधील न्यू फिश मार्केटच्या पहिल्या मजल्यावर वाढीव बांधकाम करणे कामास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. ०३/०२/२०२१ ठराव क्र. ४५२ अन्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली. (पृष्ठ क्र. १ ते ३)

तदनंतर सदरच्या कामास मा. कार्यकारी तथा शहर अभियंता यांची दि. ०५/०२/२०२१ रोजी तांत्रिक मांन्यता प्राप्त झालेनंतर सदरच कामाची निविदा दि. ०८/०२/२०२१ रोजी ई-निविदा प्रणालीद्वारे प्रसिद्ध करण्यात आली. (पृष्ठ क्र. ८७)

सदर निविदेत ०२ निविदाधारकांनी सहभाग घेतला. ई-प्रणाली अंतर्गत २ रा लखोटा उघडण्यात आला. सदरच्या निविदेतअंतर्गत मे. आशिर्वाद कंन्स्ट्रक्शन व मे. शुभ लक्ष्मी एंटरप्रायजेस यांचे निविदा दर प्राप्त झाले. (पृष्ठ क्र. २६९)

दरम्यानच्या काळात कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे रूग्णांची संख्या मोठया प्रमणात वाढली. रूग्णांचे कोव्हीडचे निदान झालेनंतर त्यांना दवाखान्यात पुढील उपचारासाठी ठेवण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. दवाखान्यातून उपचार मिळण्यासाठी रूग्णांचे नातेवाईक वेगवेगळया पद्धतीने रूग्णास ॲडमिट करून घेणेसाठी प्रशासनाकडे दाद मागत होते.

यास्तव मा. आयुक्त महोदय यांनी सदरच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील मंजूर असलेल्या मेडीकल स्टोअर बांधणेच्या कामात बदल करून त्याऐवजी त्वरीत कोव्हीड सेंटरचे बांधकाम करावे अशा सुचना दिल्या होत्या. तसेच सदर निविदेतील आर.सी.सी. चे बांधकाम मंजूर असल्यामुळे या कामास विलंब होणार

असल्यामुळे स्लॅब ऐवजी कैची व पत्रे तयार करून छप्पराचे बांधकाम कमीत कमी कालावधीमध्ये करण्यात यावे अशा सुचना बांधकाम विभागास देण्यात आल्या. मा.आयुक्त साो. यांनी कोव्हीड हॉस्पिटलचे बांधकाम करणेसंदर्भात केलेल्या बदलामुळे वरील नमुद कामाची पुढील निविदा प्रक्रिया होऊ शकली नाही व मा. आयुक्त साो. यांचे सुचनेनुसार जलदगतीने कोव्हीड सेंटरचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सद्यस्थितीत कोव्हीड रूग्णालय सुरू करण्यात आले आहे.

कोव्हीड रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे संबंधित ठेकेदारांनी निविदा रद्द करून त्यांनी भरणा केलेली रक्कम परत मिळणेकामी दिनांक २१/१०/२०२१ रोजी विनंती केली आहे.

त्यानुसार सदरचे काम रद्द करून निविदेअंतर्गत सहभागी निविदाधारक मे. शुभ लक्ष्मी एंटरप्रायजेस यांची इसारा रक्कम व मे. आशिर्वाद कंन्स्ट्रक्शन यांची इसारा रक्कम व त्यांचे निविदेतील प्राप्त दरानुसार (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०० % कमी दराने) डी.डी. द्वारे भरण्यात आलेली परफॉर्मन्स रक्कम परत करणेच्या मान्यतेस्तव सादर.

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव : - वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) हद्दीतील वॉर्ड क्र. 58 मधील न्यू फिश मार्केटच्या पहिल्या मजल्यावर वाढीव बांधकाम करणे काम रद्द करून निविदेअंतर्गत सहभागी निविदाधारक मे. शुभ लक्ष्मी एंटरप्रायजेस यांची इसारा रक्कम व मे. आशिर्वाद कंन्स्ट्रक्शन यांची इसारा रक्कम व त्यांचे निविदेतील प्राप्त दरानुसार (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.०० % कमी दराने) डी.डी. द्वारे भरण्यात आलेली परफॉर्मन्स रक्कम परत करणेस मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं 401 305
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.८८२ विभाग: वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग
दिनांक: १६ / १२ / 2019

प्रस्तावाचा विषय :राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित कृती आराखडयानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके व वाहतूक बेटे यांमध्ये शोभिवंत झाडे लागवड करून सुशोभिकरण करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मांन्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर : वरील विषयान्वये सादर करण्यात येते की, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवेच्या गुणवत्तेमध्ये (Air Quality) सुधारण करणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (Maharashtra Pollution Control Board) यांच्या निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित कृती आराखडयामध्ये उद्यान, वन संवर्धन व वृक्षप्राधिकरण विभागाशी निगडीत खालील कामाचा समावेश केलेला आहे.

Sr. No.	Mitigation Measures	Amount	Implement Department
१	Creation of the Green buffers along the traffic corridors (For First year)	८५,००,०००/-	Garden & Tree Auth.Dept.
		८५,००,०००/-	

महापालिकेने यापुर्वी तयार केलेल्या रक्कम रु. ३२ कोटी खर्चाच्या कामांना मा. प्रशासकीय ठराव क्र. ६१३ दि. १६/०३/२०२१ अन्वये मांन्यता दिलेली आहे. सदर कृती आराखडयामध्ये वरील तक्त्यात नमुद काम समाविष्ट नसुन, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (Maharashtra Pollution Control Board) यांच्या निर्देशानुसार सुधारित कृती आराखडयामध्ये समाविष्ट केलेल्या "Creation of the Green buffers along the traffic corridors" या संकल्पनेनूसार शहरातील रस्ता दुभाजके व वाहतुक बेटे यांमध्ये शोभिवंत झाडे लागवड करून सुशोभिकरण करावयाचे आहे व त्याकरिता Million Plus cities अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील एअर क्वालीटीसाठीच्या बंधनकारक अनुदानाच्या अनुषंगाने प्रथम वर्ष एकुण रक्कम रु. ८५,००,०००/- (पंच्याऐंशी लक्ष रूपये मात्र) इतका निधी उद्यान, वन संवर्धन व वृक्षप्राधिकरण विभागास उपलब्ध होणार आहे. त्यानुसार शहरातील दुभाजके व वाहतुक बेटे यांची पाहणी करण्यात आली असून "पार्क अँड गार्डन- जिल्हा दर सुची २०१५-१६" व इतर दरसुचिप्रमाणे सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

शहरातील वाहतुक बेटे व रस्ता दुभाजकांमध्ये लालमाती शेणखत भराव करून शोभिवंत वृक्ष लागवड व संगोपन करणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार रक्कम ८३,१३,४३५/- (त्र्याऐंशी लक्ष तेरा हजार चारशे पस्तीस रूपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन **"१५ वा वित्तिय आयोग मिलिनियम प्लस सिटी अंतर्गत एअर क्वालीटी अनुदानासह"** या लेखाशिर्षकामधुन भागविण्यात येईल.

तरी शहरातील वाहतुक बेटे व रस्ता दुभाजकांमध्ये लालमाती शेणखत भराव करून शोभिवंत वृक्ष लागवड व संगोपन करणेकामी तयार केलेल्या अदाजपत्रकानुसार एकुण रक्कम **रू. ८३,१३,४३५/- (त्र्याऐंशी लक्ष तेरा हजार चारशे पस्तीस रूपये मात्र)** इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेपुढे मांडणेस सविनय सादर.

ठराव निर्णय :

1) राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेने सुधारित कृती आराखडा तयार केला असुन उपरोक्त नमुद कामाचा त्यात समावेश करणेत आलेला आहे.
2) सदर कार्यक्रमांतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील वाहतुक बेटे व रस्ता दुभाजकांमध्ये लालमाती शेणखत भराव करून शोभिवंत वृक्ष लागवड व संगोपन करणेकामी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार एकुण रक्कम **रू. ८३,१३,४३५/- (त्र्याऐंशी लक्ष तेरा हजार चारशे पस्तीस रूपये मात्र)** इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.
3) सदर कामी उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाने बी १ प्रकारची इ- निविदा कार्यवाही करुन कामाची अंमलबजावणी करावी.
4) सदर कामाचा खर्च **"१५ वा वित्तिय आयोग मिलिनियम प्लस सिटी अंतर्गत एअर क्वालीटी अनुदानासह"** मध्ये उपलब्ध होणाऱ्या निधितून भागविणेत यावा.

16/11

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८८३ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- १६/१२/२०२१

विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये सातिवली दामुपाडा येथे २० मी. डी. पी. रस्त्यावर नाला क्रॉसिगसाठी लहान पुल बांधणे कामाची प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. ९९,७८,५८९/-**
प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका)	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ४८३ दि. ११/०२/२०२१
तांत्रिक मान्यता	:-	G/०७/३७/२०२१ दि. १८/०२/२०२१ ,
तांत्रिकमान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ९८,९४,८६४/-
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	:-	दै. महाराष्ट्र टाईम्स, दै.प्रहार, दै.महासागर, दै.मिड डे, दै. जागरुक टाईम्स, दै. हमारा महानगर, दै. फ्रि. प्रेस जर्नल
	:-	दि. २७/०२/२०२१
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)		दि.०५/०४/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०४
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि. २०/०७/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा. शहर अभियंता
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे	:-	०४

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	मेसर्स. श्रीकॉन	१२.७९ % कमी दराने
२	मे. श्रेयस सिव्हील कंन्स्ट्रक्शन	१२.९५% कमी दराने
३	**मे. गणेश बापु चव्हाण**	**१५.८८ % कमी दराने**
४	मे. अंश. कंन्स्ट्रक्शन	११.०० % कमी दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता, **मे. गणेश बापु चव्हाण** यांच्या निविदेतील दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१५.८८ % कमी** दराचा असुन सदरचा देकार हा कमी व वाजवी आहे. सदर निविदेकरीता निविदा समितीने दि. **०९ / ११ / २०२१** रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

तरी **मे. गणेश बापु चव्हाण** यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **१५.८८% कमी दराची** निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, **मे. गणेश बापु चव्हाण** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त कामी **मे. गणेश बापु चव्हाण** यांनी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **१५.८८% कमी दराच्या** निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८८४

विभाग : **वैद्यकीय आरोग्य**
दिनांक : १६/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील **विलगीकरण** व कोवीड-१९ आय.सी.यू कक्षांकरीता करण्यात आलेल्या **ऑक्सिजन** पाईपलाईनचे देयक अदा करणेकामी प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व १० दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी चंदनसार विरार पूर्व, कौल सिटी वसई पश्चिम येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्णांवरती उपचार करण्यांत येतात. रुग्णांना वैद्यकीय उपचारा दरम्यान ऑक्सिजन देण्याची गरज भासते. मे. लिओ ऑक्सिजन, वसई (प) यांनी दाखल केलेली ई-निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७ दि.१८/०६/२०१९ अन्वये मंजूर होती. सदर निविदेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि. १६/०३/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली असून सदर निविदाधारकांमार्फत कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा पुरविली जात होती. यानुसार मे.लिओ ऑक्सिजन यांनी कौल सिटी वसई, अग्रवाल वसई, वरुण इंडस्ट्रिज, गोन्सालो गार्सीया महाविद्यालय, वसई व श्री जिवदानी देवी रुग्णालय चंदनसार येथे ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यावह फिटींग केले असुन याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र	कामाचे नाव	रक्कम
१	कौल सिटी वसई येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	१,३४,९६८/-

२	अग्रवाल वसई येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	३,५७,९७१/-
३	वरुण इंडस्ट्रिज येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	२,४२,७२३/-
४	कौल सिटी वसई येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	१,३३,१५१/-
५	गोन्सालो गार्सीया महाविद्यालय वसई येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	१,०६,९०८/-
६	श्री जिवदानी देवी रुग्णालय चंदनसार येथे सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींगचे देयक	२,८४,३८०/-
	एकुण रुपये	१२,६०,१०१/-

तरी वरील तक्यात नमुद केलेले काम मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांनी आवश्यकतेनुसार व तोंडी आदेशनुसार केले असुन संबंधितांना सदरचे देयक अदा करणे आवश्यक आहे. कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता शासन मार्गदर्शन सुचनेनुसार साहित्य, उपकरणे इ. गोष्टी तातडीने खरेदी कराव्या लागतात. वरील तक्त्यातील नमुद कामी एकूण रक्कम रु.१२,६०,१०१/- इतके देयक अदा करावयाचे असुन सदरचे देयक "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील शिल्लक तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) **प्रकरण ५.२.२ अन्वये मला असलेल्या** अधिकारानुसार वरील तक्त्यातील नमुद कामी **मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांच्यामार्फत** विनानिविदा ऑक्सिजन पाईपलाईन साहित्यासह फिटींग **केलेली असुन सदरकामी एकूण** रक्कम रु.१२,६०,१०१/- (अक्षरी- बारा लाख साठ हजार **एकशे एक रुपये** मात्र) **इतक्या** रक्कमेचे देयक अदा करणेस प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात **येत आहे.**

(गंगाथरन.डी) २५/११

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८८५ दिनांक : ३६/१२/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.२९ मध्ये प्रथमेश अपार्टमेंट ते मेन रोड पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. (फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :- १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.२६,४९,३२३/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती ठराव क्र.४२० दि.३/१/२०१९

३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.२९/०१/२०१९

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु.:- रु.२६,४९,३२३/-

५) जाहिर निविदा सुचना :- १) दै.प्रातःकाल, २) दै.महासागर, ३) दै.प्रहार } दि.२/६/२०१९

६) जाहिर निविदा सुचना (फेर निविदा) :- १) दै.वार्ताहर, २) दै.फ्रि प्रेस जर्नल, ३) दै.मुंबई मित्र } दि.३०/०८/२०१९

७) ई-निविदा प्राप्त :- ३

८) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१७/०९/२०१९

९) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२०/१२/२०१९

१०) प्राप्त निविदांची संख्या :- ३

११) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.मेहूल अरविंद वर्तक	अंदाजपत्रकापेक्षा १५.००% जास्त दराने	पात्र
२.	मे.आशिर्वाद कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा १८.५०% जास्त दराने	पात्र
३.	मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.	अंदाजपत्रकापेक्षा ७.००% जास्त दराने	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (७.००%) जास्त दराची** निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी आहे. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम राज्य दर सन २०१७-१८ नुसार बनविण्यात आले आहे. लघुत्तम निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांनी भरलेल्या निविदा रक्कमेची **(रु.२४,९७,२४८/-)** सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या दर सूची सन २०१८-१९ च्या दरानुसाराच्या रक्कमेची **(रु.२५,७५,७६०/-)** तुलना केली असता सदर रक्कम **(+) ३.३६% ने जास्त** आहे.

तरी सदर कामी निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** हे काम करण्यास पात्र असून त्यांना दि.१४/०२/२०२० रोजी वाटाघाटीचे पत्र. देऊन निविदाधारकास वाटाघाटीने काम करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार दि.१७/०२/२०२० रोजी निविदा समिती मध्ये चर्चा झाली असता सदर निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांनी सदर काम (वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.७०% जास्त दराने काम करण्यास समर्थता दर्शविली आहे. तसेच याबाबत दि.१७/०२/२०२० रोजी पत्र दिले आहे.

सदर निविदा दर (वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.७०% जास्त दराने सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदा दर मंजूर करण्यात आले आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांच्या निविदेतील **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.७०% जास्त** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णय :- उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४२० दि.३/१/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** ह्यांचे **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.७०% जास्त दराने**) हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.७०%** जास्त **दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८८६ दिनांक : ३६/१२/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.१३ मध्ये राधेय बिल्डींग ते नारिंगी बायपास रोड पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :- १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३४,१८,६२५/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३४५ दि.१७/९/२०१९

३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.१७/०९/२०१९

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.३४,१८,६२५/-

५) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/श.म./बांध/८३५/२०१९ दि.२०/१२/२०१९ शहर अभियंता, व.वि.श.म.

६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक :- दि.२२/१२/२०१९

७) जाहिर निविदा सुचना :- १) दै.फ्रि प्रेस जर्नल
२) दै. लोकमत
३) दै.पूर्णविराम

८) ई-निविदा प्राप्त :- ३

९) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१८/०१/२०२०

१०) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.४/३/२०२०

११) प्राप्त निविदांची संख्या :- ३

१२) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.कृतिका कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ०.११% जास्त दराने	पात्र
२.	मे.साई कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ३.००% जास्त दराने	पात्र
३.	मे.मेघना इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकापेक्षा (-) ०.१२% कमी दराने	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.मेघना इंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** ((-)०.१२%) कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.मेघना इंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णय :- उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३४५ दि.१७/०९/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

16/12/24

आयुक्त तथा प्रशासक

वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८८७

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : ३६/१२/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.१३ मध्ये सुशालिनी अपार्टमेट ते नारिंगी बायपास रोड पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :- १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३३,३७,२१७/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८ दि.१७/९/२०१९

३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.१७/०९/२०१९

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.३३,३७,२१७/-

५) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/श.म./बांध/८३५/२०१९ दि.२०/१२/२०१९ शहर अभियंता, व.वि.श.म.

६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक :- दि.२२/१२/२०१९

७) जाहिर निविदा सुचना :- १) दै.फ्रि प्रेस जर्नल
२) दै. लोकमत
३) दै.पूर्णविराम

८) ई-निविदा प्राप्त :- ३

९) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१८/०१/२०२०

१०) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.४/३/२०२०

११) प्राप्त निविदांची संख्या :- ३

१२) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.कृतिका कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ०.११% जास्त दराने	पात्र
२.	मे.साई कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ३.००% जास्त दराने	पात्र
३.	मे.मेघना इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकापेक्षा (-) ०.१२% कमी दराने	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.मेघना इंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** ((-)०.१२%) कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.मेघना इंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णय :- उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८ दि.१७/९/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.मेघना इंटरप्रायजेस** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ०.१२% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

16/12

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८८८ दिनांक : १६/१२/२०१९

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३३ मध्ये बोळींज सर्वे क्र.४०४ जवळील नाल्यामध्ये संरक्षक भिंतीचे बांधणे. (फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :- १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४८,८१,३३६/-

२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती विषय क्र.३२१ दि.३/११/२०१८

३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.२७/१२/२०१८

४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.४८,८१,३३६/-

५) जाहिर निविदा सुचना :- १) दै.प्रातःकाल, २) दै.महासागर, ३) दै.प्रहार } दि.२/६/२०१९

६) जाहिर निविदा सुचना (फेर निविदा) :- १) दै.वार्ताहर, २) दै.फ्रि प्रेस जर्नल, ३) दै.मुंबई मित्र } दि.३०/०८/२०१९

७) ई-निविदा प्राप्त :- २

८) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.०२/११/२०१९

९) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.०९/०१/२०२०

१०) प्राप्त निविदांची संख्या :- २

११) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील	शेरा
१.	मे.मेहुल अरविंद वर्तक	अंदाजपत्रकापेक्षा (-) २.३४% कमी दराने	परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे.	पात्र
२.	मे.आशिर्वाद कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा ०.००% जास्त दराने	--	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.मेहुल अरविंद वर्तक** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२.३४%** कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

सदर निविदा दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२.३४%** सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदा दर मंजूर करण्यात आले आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.मेहुल अरविंद वर्तक** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२.३४% कमी दरास** मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव / निर्णय :- उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३२१ दि.०३/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.मेहुल अरविंद वर्तक** ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२.३४% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.मेहुल अरविंद वर्तक** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-)२.३४% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ८८e

दिनांक : २६/३२/२०२१

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305

दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४१ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक :२३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती सी चंदनसार अंतर्गत जिवदानी रोड येथे हिलपार्क सोसायटी ते धैर्यलक्ष्मी अपार्टमेंट पर्यंत १५० मि.मी व्यासाची जी.आय जलवाहिनी अंथरणे

प्रस्तावाचा मजकूर:- :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील जिवदानी रोड येथे हिलपार्क सोसायटी, हिलपॉईंट , धैर्यलक्ष्मी अपार्टमेंट या भागातील सोसायटी मध्ये पाणी वितरण करण्यासाठी 300 मि.मी व्यासाच्या मेन जलवाहीनी वरुन क्रॉस कनेक्शन करुन सदरील सोसायटीला पाणीपुरवठा केला जात आहे. तरी पाणीपुरवठा त्या भागात कमी दाबाने जात असल्याने तेथील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी गणेश हॉस्पीटल उंच जलकुंभ टाकीवरुन पाणीपुरवठा केल्यास त्या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करता येईल. जेनेकरुन तेथील भागातील पाण्याची समस्या दुर होईल त्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजपत्रकीय रक्कम रु. 2,98,866/- एवढी आहे.

अ.क्र	कामाचा मजकुर	रक्कम
1	प्रभाग समिती सी चंदनसार अंतर्गत जिवदानी रोड येथे हिलपार्क सोसायटी ते धैर्यलक्ष्मी अपार्टमेंट पर्यंत १५० मि.मी व्यासाची जी.आय जलवाहिनी अंथरणे	रु 2,98,866/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषंगीक खर्चास मा.आयुक्त सो.हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपआयुक्त
परिमंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४२ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/१२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु) प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.01 मधील कुंभारपाडा येथे 3"GI जलवाहिनी अंथरणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार क्षेत्रातील प्रभाग सी अंतर्गत वॉर्ड क्र.01 येथील कुंभारपाडा येथे 2"HDPE जलवाहिनी असुन त्या रस्त्यावरुन जड वाहतुक असल्याकारणे सदरची जलवाहिनी वारंवार लिकेज होत आहे त्यामुळे नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्यामुळे सदर ठिकाणी GI जलवाहिनी अंथरण्या बाबत माजी सभापती यांनी तोंडी सुचना दिल्या आहेत. तरी सदर ठिकाणी 3"GI जलवाहिनी (L=200m) अंथरणे गरजेचे आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.01 मधील कुंभारपाडा येथे 3"GI जलवाहिनी अंथरणे	२,८४,१८१/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६३ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु) प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.06 मधील वैष्णवीनगर येथे 4 इंच जलवाहिनी अंथरणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार क्षेत्रातील प्रभाग सी अंतर्गत वॉर्ड क्र.06 मधील वैष्णवीनगर येथे उंचावरील भागाकरीता स्वतंत्र जलवाहिनी नसल्यामुळे उंचभागावर राहणा-या नागरीकांना पाणी अपुऱ्या दाबाने जात असल्यामुळे त्यांना पाण्याची समस्या भेडसावत असल्यामुळे तेथील स्थानिक नागरिकांनी तक्रार केली आहे. त्यामुळे सदरच्या ठिकाणी 4" GI जलवाहिनी अंथरल्यास तेथील नागरीकांची पाण्याची समस्या दुर होईल.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.06 मधील वैष्णवीनगर येथे 4 इंच जलवाहिनी अंथरणे	२,९१,९११/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४४ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/१२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- कार्यक्षेत्रतील वॉर्ड क्र.२ कोपरी रोड येथे डॉ.पाटील हॉस्पिटल जवळ लाईन दुरुस्ती करणे.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका चंदनसार क्षेत्रातील प्रभाग सी अंतर्गत क्र. वॉर्ड क्र.२ कोपरी गावामध्ये ४ जलवाहीनी व ६ इंच जलवाहीनी सतत लिकेज होत असल्याने व रोड रुंदी करणे करताना लाईन तुटलेली आहे तरी गासकोपरी मधील पाण्याचा पुरवठा सुरक्षीत ठेवण्यासाठी तेथील जलवाहीनी दुरुस्ती करणे अत्यावशक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. २ कोपरी रोड येथे डॉ.पाटील हॉस्पिटल जवळ लाईन दुरुस्ती करणे	१,६७,०८५/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४५ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/१२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु) प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील आईस फॅक्टरी येथे ३०० मिमी व्यासाची दुरुस्तीकरणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१८ मधील आईस फॅक्टरी नाल्यामधुन फुलपाडा विभागागस पाणी पुरवठा करणारी ३०० मिमी व्यासाची एम एस पाईप लाईन नाल्याच्या आत मधुन गेली असुन ती पाईपलाईन नाल्यामधुन सडली आहे व नाल्यामध्ये असल्यामुळे दुरुस्ती देखील करणे शक्य नाही त्यामुळे नाल्याचे घाण पाणी जलवाहिनीव्दारे फुलपाडयातील नागरीकांना जात आहे. त्यामुळे सदरची जलवाहिनी नाल्यावरुन टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील आईस फॅक्टरी येथे ३०० मिमी व्यासाची दुरुस्तीकरणे	२,९३,०३७/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
प्रभाग समिती -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४६ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/१२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु) प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.०८ मधील सहकार नगर मध्ये ५०० मिमी ते २५० मिमी जलवाहिनीला क्रॉस कनेक्शन करणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.०८ मधील सहकार नगर येथील सद्यस्थितीत असलेले मुख्य वितरण जलवाहिनी व्दारे सहकार नगर मधील बिठूरमाळी कंपाऊंड, बीबी मिश्रा कंपाऊंड लक्ष्मण नगर काशीनगरी,बदकलपाडा नवीन शाळा या उच्चवरील भागास पुरेश्या दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने तेथील नागरीकांच्या व लोकप्रतिनिधीच्या याबाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे काम करणे आवश्यक आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.०८ मधील सहकार नगर मध्ये ५०० मिमी ते २५० मिमी जलवाहिनीला क्रॉस कनेक्शन करणे	३,०४,१२८/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
प्रभाग मंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.401305
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४७ **विभाग : पाणीपुरवठा**

दिनांक : २३/७२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु) प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील एमबीआर येथे ४०० मिमी ते ८०० मिमी व्यासाच्या जलवाहीन्याना क्रॉस कनेक्शन करणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका एमबीआर च्या खालील बाजूस विरार पू. शहरास पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहिनीस (विरार सप्लाय) पुरेश्या दाबाने पाणी उपलब्ध गरजेचे आहे जेणेकरुन विरार पूर्व मधील सहकार नगर, जिवदानी रोड या भागास पुरेश्या दाबाने पाणी पुरवठा सुरळीत करता येईल. यासाठी कामकरणे गरजेचे आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1	विरार (पु) प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील एमबीआर येथे ४०० मिमी ते ८०० मिमी व्यासाच्या जलवाहीन्याना क्रॉस कनेक्शन करणे.	३,१९,३१६/-

ठराव :- उपरोक्त नमूद विकास कामाची आवश्यकता लक्षात घेता सदर कामासाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/आ.का /४७/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ -१
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९४८ विभाग :- विदयुत
दिनांक :-२३/७२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- व.वि.श.म. अंतर्गत येणा-या सार्वजिनिक दिवाबत्ती व विद्युत व्यवस्थेमधील भंगार साहित्य लिलाव करणेकामी प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **कामाची आवश्यकता**:- व.वि.श.म. विद्युत विभागातील भंगार साहीत्य निविदा प्रक्रियेद्वारे लिलाव करणे गरजेचे आहे. तसेच वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) ते (आय) अंतर्गत सार्वजनिक रस्त्यावरील तसेच उद्यान, तलाव, मैदान, स्मशानभूमी येथील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था याच सोबत कार्यालय, रुग्णालय आरोग्य केंद्र इत्यादी इमारतीमधील देखभाल दुरूस्तीची कामे महानगरपालिका विद्युत विभागामार्फत करणेत येतात. सदर ठिकाणांची दैनदिन विद्युत देखभाल दुरूस्ती करण्याकरीता लागणारे आवश्यक साहित्य वार्षिक मंजूर निविदा धारकांकडून खरेदी करून अथवा निविदा प्रक्रिया राबवून प्रभाग निहाय करण्यात येतात. दैनदिन देखभाल दुरुस्तीचे कामे करत असताना सार्वजनिक रस्त्यावरील तसेच उद्यान, तलाव, मैदान येथील जूने/नादुरूस्त व निकामी साहित्य जसे की, नादुरूस्त विद्युत पोल, ब्रॅकेट, लाईट फिटींग, दिवे, नादुरूस्त चोक, इग्नेटर, कॅपेसिटर, जिर्ण झालेली केबल तसेच कार्यालय, रूग्णालय, आरोग्य केंद्र इत्यादी इमारती मधील नादुरूस्त लाईट फिटींग व इतर विद्युतीय साहित्य बदली करून जुने व निकामी झालेले साहित्य प्रभागांच्या विद्युत विभागाच्या गोडावूनमध्ये जमा करण्यात येतात. दैनदिन सार्वजनिक दिवाबत्ती व विद्युत देखभाल दुरूस्ती कामातुन निघणारे नादुरूस्त, निकामी व जिर्ण झालेल्या भंगार विद्युतीय साहित्यांचा लिलाव केल्यास महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ करणे शक्य होणार आहे. तसेच भंगार साहित्याने व्यापलेली जागा रिक्त होणार आहे. काही साहित्य प्रभाग विद्युत विभागाचे गोड़ाऊनचे बाहेर पडून असल्याने व पावसात भिजून त्यांचे मुल्यांकन कमी होत जाणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक नुक्सान होणार आहे. तरी भंगार साहित्याची विक्री करणे गरजेचे आहे. तरी भंगार साहित्याची प्रभागस्तरावर विक्री करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९. चे कलम ७९ (ब) व (क) नुसार मंजुरी मिळावी ही विनंती.

२) **जागेची मालकी** :- वसई विरार शहर महानगरपालिका.

प्रस्तावाचा ठराव :- महानगरपालिका विद्युत विभागात दैनदिन देखभाल दुरूस्तीचे काम करत असताना विद्युतीय साहित्य बदली करून जूने व निकामी झालेले साहित्य प्रभागांच्या विद्युत विभागात जमा करण्यात येत आहे. गोडाउनमधील भंगार साहित्याची विक्री केल्यास जागा मोकळी होईल व महानगरपालिकेच्या उत्पनात वाढ होईल तथापी सदर भंगार साहित्य विक्री करावयाचे झल्यास जेथे आहेत तेथे या तत्वानुसार ९ प्रभागात असलेल्या भंगार साहित्याची पाहणी करून इच्छुक ठेकेदारामार्फत दर मागविणे आवश्यक आहे.

सदर ९ प्रभागातून प्राप्त भंगार साहित्याचा यादीनुसार स्पर्धात्मक ई-निविदा प्रक्रियेद्वारे भंगार साहित्याचे बी-२ नमुन्यात प्रभाग स्तरावर दर मागवून जास्तीत -जास्त रक्कमेंस भंगार साहित्य खरेदी करणा-या ठेकेदार अथवा निविदा धारकास भंगार साहित्य विक्रीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ब) व (क) नूसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सदर प्रक्रिया परिमंडल उप-आयुक्त १,२,३ यांचे मार्फत पार पाडणेस मान्यता देत आहे.

(गंगाथरन डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय , विरार पुर्व, जि.पालघर , जि.पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५०१/०२/०३/०४/०५/०६ , फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९४९ विभाग :- आस्थापना (मु.)
दिनांक :-२३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- मे.सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना पुढील ६ महिन्याची मुद्त वाढ देण्याबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडुन डिसेंबर २०१५ ते २०१६ कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करण्यास व अतिरिक्त सुरक्षा रक्षक घेऊन प्रभाग समिती कार्यालयाना पुर्णवेळ सुरक्षा रक्षक पुरविण्याचे निर्देश दिलेले होते. त्या सोबतच त्याकामी होणाऱ्या वाढीव खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.यांनी दि. १९/०८/२०१६ रोजी करारनामा केलेला आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना त्यांच्या मार्फत कार्यरत असलेल्या १५४ ठेका सुरक्षा रक्षकांपैकी ५० सुरक्षा रक्षक कमी करण्याचे पत्र दिलेले आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. मधुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे जेवढे सुरक्षा रक्षक नोंदणी होतील तेवढे सुरक्षा रक्षक मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे ठेक्यातुन कमी करण्याचे मान्यता दिलेली आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडील ३५ सुरक्षा रक्षक हे महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोदींत झाल्याकारणाने त्यांच्याकडील कार्यरत असणाऱ्या १०४ सुरक्षा रक्षकांमधुन ३५ सुरक्षा रक्षक कमी करण्याचे पत्र दिलेले आहे.

सध्यास्थितीमध्ये मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडे ६९ सुरक्षा रक्षक (महिला/पुरुष) कार्यरत आहेत. . मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचा ठेका ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच ठेवण्यात यावा व दि. ०१ जानेवारी, २०२२ पासुन त्यांचा ठेका बंद करण्यात यावा, असे स्पष्ट नमुद आहे. त्याचप्रमाणे मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.मधील जे सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत होतील त्यांचे वेतन सदरच्या मंडळामार्फत अदा केले जाईल व जे सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा त्यांचेकडे नोंदीत न झाल्यास सदरच्या कर्मचाऱ्यांची राहील, असा प्रशासकीय ठराव पारित केलेला आहे.

तरी मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडे कार्यरत असलेल्या ६९ सुरक्षा रक्षकांपैकी किती सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत होणार आहेत . याबाबत महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना पत्र देणे आवश्यक वाटते. सदरहु ६९ सुरक्षा रक्षकांपैकी जे सुरक्षा रक्षक नोंदीत होणार नाहीत असे सुरक्षा रक्षक ठेक्यातुन कायमस्वरुपी बाहेर होतील.

अ.क्र.	सुरक्षा रक्षक पुरविण्याऱ्या एजेंन्सीचे नाव	सुरक्षा रक्षक संख्या
१.	मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.	६९
२.	सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा	१३५
३.	महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ	५०
एकुण		२५४

कोव्हिड-१९ ची संभव्या तिसरी लाट व महानगरपालिकेची आगामी निवडणुक लक्षात घेता सदर ठेकेदारास दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुद्दतवाढ दयावी अगर कसे याबाबत योग्यत्या आदेशास्तव सादर केलेली आहे.

ठराव निर्णय :- कोव्हिड-१९ ची संभाव्य तिसरी लाट व महानगरपालिकेची आगामी निवडणुक लक्षात घेता मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.यांनी दि. १९/०८/२०१६ रोजी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार व मंजुर निविदेच्या दरानेच सदर ठेकेदारास दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुद्दतवाढ देण्यात येत आहे. सदर कालावधीत होणाऱ्या खर्चास प्रशासकीय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४५०

विभाग : बांधकाम

दिनांक : २३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील समृध्दी बंगल्या लगतचा रस्ता डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ३,५३,७४०/-
प्रशासकीय मान्यता	:-	आ.क्र. वविशम/बांध/उ.आ.प.३/२४१/२१-२२ दि. १५/०७/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	मा. उप अभियंता पा.क्र. ०२ अ.क्र. ११ दि. १६/०७/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	दि. २७/०७/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ११/०८/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
एकुण निविदा	:-	०४
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे. सहारा एंटर	१५.००% कमी दराने	
२.	मे. अरमान एंटर	५.००% कमी दराने	-
३.	मे. रोहन किसन मोहिते	१०.५०% कमी दराने	-
४.	मे. आकाश एंटर	५.००% जास्त दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. सहारा एंटरप्रायजेस यांची १५.००% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता मे. सहारा एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील १५.००% कमी दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि.22/9/2021 रोजी अन्वये मा. निविदा समितीने मे. सहारा एंटरप्रायजेस यांच्या १५.००% कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन मे. सहारा एंटरप्रायजेस यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सहारा एंटरप्रायजेस ह्यांची १५.००% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उपायुक्त परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन ४०१ ३०५.
दुरध्वनी क्र. ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७
ईमेल – vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ८५१ विभाग - आस्थापना (मुख्यालय)
दिनांक - २३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- श्री. वाय.एस. रेड्डी, उपसंचालक, नगर रचना विभाग यांना वार्षिक वेतनवाढी मंजूर करून त्यानुसार थकबाकी देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये श्री. वाय.एस. रेड्डी, उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी दि.१५/०२/२०२० च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सिडकोने तयार केलेला आराखडा राबविणे सुलभ व्हावे म्हणून मा. मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/०७/२०१० ला झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सिडकोमध्ये कार्यरत असलेले श्री. वाय.एस. रेड्डी यांना महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने दि.१६/०८/२०१० पासून रुजू करून घेण्यात आले. त्यावेळी त्यांना वेतनश्रेणी १५६००-३९१०० अ ग्रेड पे ६६०० मंजूर करण्यात आली होती.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप संचालक, नगर रचना हे पद सरळ सेवेने भरण्यासाठी दि.१२/०५/२०११ ला दै. लोकमत, दै. सामना व दै. नरवीर चिमाजी या वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली.

श्री. रेड्डी यांनी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमचे समावेशन करावे यासाठी दि.२१/०५/२०११ रोजी निवेदन सादर केले होते. त्यानुसार मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे आदेश दि.०१/०७/२०११ अन्वये त्यांचे कायमचे समावेशन उप-संचालक, नगररचना या पदावर करण्याचे आदेश, शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात आलेले होते.

उपरोक्त जाहिरातीनुसार श्री. रेड्डी यांनी उप संचालक, नगररचना या पदाच्या सरळसेवेसाठीसुध्दा अर्ज केला होता. त्यानुसार निवड समितीने दिलेल्या निर्णयानुसार श्री. रेड्डी यांची मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.६ दि.०९/०२/२०१२ च्या मान्यतेनुसार मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या आदेश क्र. वविशम/आस्था/७८१/२०११-१२ दि.१०/०२/२०१२ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप-संचालक, नगररचना या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली.

थोडक्यात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. रेड्डी यांची प्रथम समावेशनाचे आदेश काढण्यात आले आणि नंतर सरळ नियुक्तीचे आदेश काढण्यात आले.

नियुक्तीचे आदेश निघाल्यानंतर सिडकोच्या आस्थापनेचा श्री. रेड्डी यांनी राजीनामा देणे क्रमप्राप्त होते. मात्र सिडकोने त्यांच्या राजीनामा पत्राबाबत महानगरपालिकेला पत्र क्र.सिडको/व्य.कार्मिक/प्रतिनियुक्ती/२०१२/१९०२ दि.०१/०३/२०१२ अन्वये असे कळविले की, राजीनाम्याप्रकरणी व्यवस्थापनाचा निर्णय व्हावयाचा आहे. हा निर्णय झाल्यावर तसे कळविण्यात येईल. दरम्यानच्या काळात श्री. रेड्डी यांचा वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्वीच्याच अटी व शर्तींवर वाढविण्यात येत आहे.

दरम्यानच्या काळात दि.२८/०४/२०१६ रोजी श्री. रेड्डी यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत रु.२५ लक्ष रुपयांची लाच देताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्यावेळी त्यांना अडुेचाळीस तासांपेक्षा जास्त कालावधी पोलीस कस्टडीत राहिल्यामुळे निलंबित करणे सक्तीचे होते. त्यावेळी सिडकोकडून त्यांच्या राजीनाम्यावर अंतिम निर्णय न झाल्यामुळे, त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.०७/०५/२०१६ रोजी संपला म्हणून त्यांना महापालिकेतून कार्यमुक्त करण्यात आले. या आधारावर सिडकोने त्यांना दि.०९/०५/२०१६ पासून निलंबित केले.

या निलंबनाविरुध्द व महापालिकेने त्यांना दि.०७/०५/२०१६ रोजी कार्यमुक्त केले म्हणून श्री. रेड्डी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र.१००६१/२०१७ दाखल केले. या दाव्याचा अंतरिम आदेश (Interim relief) मा. उच्च न्यायालयाने दि.२१/०१/२०१९ रोजी असा दिला की, "श्री. रेड्डी यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर महापालिकेने रुजू करून घ्यावे आणि महानगरपालिकेला आवश्यकता वाटत असेल तर श्री. रेड्डी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करावी."

मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने महापालिकेचे विधी सल्लागार श्री. अतुल दामले यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले. ॲड. श्री. अतुल दामले यांच्या दि.२८/०१/२०१९ च्या अभिप्रायानुसार श्री. रेड्डी यांना महापालिकेच्या आस्थापनेवर दि.२०/०२/२०१९ पासून रुजू करून घेण्यात आले. तेव्हापासून ते उप-संचालक, नगररचना या पदावर नगररचना विभागामध्ये कार्यरत आहेत.

मा. उच्च न्यायालय यांचे अंतरिम आदेशाच्या आधारावर सिडकोने त्यांच्या पत्र क्र. CIDCO/PERS/EST/2020/E/1799 DT.23/01/2020 महानगरपालिकेला असे कळविले की, "मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार ज्याअर्थी श्री. वाय.एस. रेड्डी, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दि. २०/०२/२०१९ रोजी रुजू झाले आहेत, त्याअर्थी त्यांचा राजीनामा पूर्वलक्षी प्रभावाने (म्हणजेच दि.१०/०२/२०१२ पासून) मंजूर करण्यात आलेला आहे.

वरील सर्व परिस्थिती बघून हे स्पष्ट होते की, मा. न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार दि.१०/०२/२०१२ पासून श्री. रेड्डी या महापालिकेचे अधिकारी आहेत व ते दि.१०/०२/२०१२ पासून निलंबन काळ वगळता महापालिकेच्या तिजोरीतून वेतन घेत आहेत.

श्री. रेड्डी यांनी दि.१५/०२/२०२० रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांना दि.२०/०२/२०१९ पासून नियमित वेतनवाढ देणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्यांची प्रथम नियुक्ती वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० अ ग्रेड पे ६६०० मध्ये झालेली होती. मात्र शासन निर्णय दि.०४/०५/२००६ नुसार उप-संचालक, नगररचना या पदाला वेतनश्रेणी रु.१०६५०-१५५०० अ ग्रेड पे ७६०० लागू करणे अनिवार्य आहे. या सुधारीत वेतनश्रेणी नुसार त्यांचे वेतन निश्चित करुन पुढे सातव्या वेतन आयोगानुसार समकक्ष स्तर मध्ये त्यांची वेतननिश्चिती करावी लागेल.

प्रसंगतः असेही निदर्शनास आणण्यात येत आहे की, ते दि.०९/०५/२०१६ पासून दि.१९/०२/२०१९ पर्यंत सिडकोच्या आदेशानुसार निलंबित होते. या कालावधीत त्यांना निर्वाह भत्ता सिडकोकडून मिळाला किंवा कसे, याची माहिती महापालिकेला नाही. तथापि, या कालावधीचा निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालानुसार निर्णय घेणे अपेक्षित आहे.

१. वसई विरार शहर महानगरपालिकेने दि.१०/०२/२०१२ च्या आदेशान्वये श्री. वाय.एस. रेड्डी यांची उप-संचालक, नगररचना या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली असल्याने व सिडकोने त्यांचा राजीनामा पूर्वलक्षी प्रभावाने (म्हणजेच दि.१०/०२/२०१२ पासून) मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे श्री. रेड्डी हे दि.१०/०२/२०१२ पासून महानगरपालिकेचे कर्मचारी झालेले असल्याने श्री. रेड्डी यांना सुधारीत वेतनश्रेणी रु.१०६५०-१५५०० अ ग्रेड पे ७६०० दि.१०/०२/२०१२ पासून लागू करणेस व त्यानुसार ७ व्या वेतन आयोगामधील समकक्ष स्तरावर वेतननिश्चिती करणेस व फरकाची रक्कम अदा करणे आवश्यक आहे.
२. श्री. रेड्डी यांचे सेवापुस्तक महानगरपालिकेमध्ये बनविणे आवश्यक आहे.
३. श्री. रेड्डी यांचेखाती सिडको कार्यालयाकडे महानगरपालिकेने जमा केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम महानगरपालिकेकडे वर्ग करणे आवश्यक तो पाठपुरावा करणे अपेक्षित आहे.

याबाबत निर्णय घेणेसाठी प्रशासनाने अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

निर्णय :- वरील अहवालाचे अवलोकन करता खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

१. ज्याअर्थी वसई विरार शहर महानगरपालिकेने दि.१०/०२/२०१२ च्या आदेशान्वये श्री. वाय.एस. रेड्डी यांची उप-संचालक, नगररचना या पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली, त्याअर्थी सिडकोने त्यांचा राजीनामा पूर्वलक्षी प्रभावाने (म्हणजेच दि.१०/०२/२०१२ पासून) मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे श्री. रेड्डी हे दि.१०/०२/२०१२ पासून महानगरपालिकेचे कर्मचारी झालेले असल्याने श्री. रेड्डी यांना सुधारीत वेतनश्रेणी रु.१०६५०-१५५०० + ग्रेड पे ७६०० दि.१०/०२/२०१२ पासून लागू करणेस व त्यानुसार ७ व्या वेतन आयोगामधील समकक्ष स्तरावर वेतननिश्चिती करणेस व फरकाची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे..

२. श्री. रेड्डी यांचे सेवापुस्तक महानगरपालिकेमध्ये बनविण्यात यावे.

३. श्री. रेड्डी यांचेखाती सिडको कार्यालयाकडे महानगरपालिकेने जमा केलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम महानगरपालिकेकडे वर्ग करणेकामी सिडको प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करणेत यावा.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९५२ विभाग : डोंबिवली
दिनांक : २३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०६ मधील डायस परेरा नगर येथील संघमित्र अपा. लगतचा रस्ता डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४,९९,१७३/-
प्रशासकीय मान्यता	:-	आ.क्र. वविशम/बांध/उ.आ.प.३/२४२/२१-२२ दि. १५/०७/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	मा. उप अभियंता पा.क्र. ०२ अ.क्र. १२ दि. १६/०७/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	दि. २७/०७/२०२१
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ११/०८/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	उप अभियंता
एकुण निविदा	:-	०४
निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा)	:-	

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१.	मे. सहारा एंटर	१२.००% कमी दराने	
२.	मे. अरमान एंटर	५.००% कमी दराने	-
३.	मे. रोहन किसन मोहिते	१०.५०% कमी दराने	-
४.	मे. आकाश एंटर	५.००% जास्त दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांची १२.००% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील १२.००% कमी दराने हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि.22/12/2021 रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या १२.००% कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे. सहारा एंटरप्रायजेस** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचीत निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता **मे. सहारा एंटरप्रायजेस** हयांची १२.००% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२१ दि. २८/०६/२०२१ रोजीने मा. उपायुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उपायुक्त परिमंडळ-३
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५११०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५११०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ९५३ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :२३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील प्रभाग क्र.०८ मध्ये विरार (पू) जिवदानीपाडा जैरिना शेख यांच्या घरापासून ते परिन शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीया मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील प्रभाग क्र.०८ विरार (पू) जिवदानीपाडा जैरिना शेख यांच्या घरापासून ते परिन शेख हयांच्या घरापर्यंतचा रस्ता हा कच्चा स्वरुपाचा आहे. त्यामूळे सदर ठिकाणी पावसाळ्यामध्ये चिखल होऊन नागरिकांना ये-जा करण्यास त्रास होतो. सदर रस्ता हा अरुंद असल्यामुळे सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे आवश्यक आहे. दरसुची २०१९-२० नुसार रक्कम रु.४,१४,६०३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंतभूर्त बाब	अंदाजपत्रकीय रक्कम (रु.)
१	वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील प्रभाग क्र.०८ मध्ये विरार (पू) जिवदानीपाडा जैरिना शेख यांच्या घरापासून ते परिन शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे	सोलिंग, M-२०, कॉक्रीट	४,१४,६०३/-

ठराव :- उपरोक्त नमूद कामाची आवश्यकता लक्षात घेता प्रभाग क्र.०८ मध्ये विरार (पू) जिवदानीपाडा जैरिना शेख यांच्या घरापासून ते परिन शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,१४,६०३/- अंदाजपत्रकास व त्याअनुषंगीक होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त साो. हयांचे कडील दि. २८/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म / आका/ ४८/ २०२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ-१
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन ४०१ ३०५.
दुरध्वनी क्र. ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७
ईमेल – vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९५४ विभाग - आस्थापना (मुख्यालय)
दिनांक - २३/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०२०-२०२१, २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी नेमलेल्या अधिकर्त्याकडुन पुरविलेले जाणारे अतिरीक्त मनुष्यबळास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर अभिकरणाने कामे करण्यासाठी अभिकर्त्याची नेमणुक करणेकामी प्रशासकीय ठराव क्रमांक ०६ दिनांक ०७/०७/२०२० अन्वये मान्यता घेवुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन आलेल्या निविदांपैकी मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट यांची ०.९९ टक्के कमी दराची निविदा मान्य करुन त्यांना प्रशासकीय ठराव क्रमांक १०८ दिनांक १८/०९/२०२० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली होती. सदर ठरावानुसार खालीलप्रमाणे मनुष्यबळ घेण्यास मान्यता दिलेली होती.

तक्ता क्र. १

अ.क्र.	पदनाम	संख्या
१.	लिपिक-टंकलेखक	२४४
२.	लघु-टंकलेखक	९
३.	आरोग्य निरिक्षक	४८
४.	ग्रंथपाल	२
५.	सहा. ग्रंथपाल	७
६.	दुरध्वनी चालक	२
७.	तारतंत्री	५९
८.	प्रमुख माळी	३
९.	आरेखक	२
१०.	सर्वेक्षक	१
११.	अनुरेखक	१
१२.	अग्निशमन विमोचक	१७७
१३.	चालक यंत्रचालक (अग्निशमन विभाग)	४१
१४.	वाहन चालक	१०१
१५.	शिपाई	२१
१६.	कक्षसेवक, वैद्यकिय आरोग्य विभाग	४३
१७.	कक्षसेविका, वैद्यकिय आरोग्य विभाग	६
१८.	आया, वैद्यकिय आरोग्य विभाग	२९
१९.	मजूर	७९

२०.	सहा. क्रिडा अधिकारी	१
२१.	सहा. उद्यान अधिक्षक	३
२२.	विधी अधिकारी	५
२३.	कनिष्ठ अभियंता सर्वसाधारण	१०५
२४.	कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा	२०
२५.	घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी कुशल मनुष्यबळ	११०
	एकुण	१११९

उक्त ठरावापेंक्षा कार्यादेश क्रमांक जा.क्र.व.वि.श.म/आस्था/७२८/२०२०, दिनांक २९/१०/२०२० मध्ये १११९ व्यतीरिक्त ५९ वाहनचालक व ५ कनिष्ठ अभियंता यांचा समावेश आहे.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/७३६/२०२०, दिनांक २९/१०/२०२०. अन्वये पाणी पुरवठा विभागाने साहित्य व मनुष्यबळासह देखभाल दुरुस्ती कामासाठी काढण्यात आलेल्या ठेक्यात कार्यरत असलेले ४०४ मजुर सदरचा ठेका बंद करुन आस्थापना विभागाच्या ठेक्यात वर्ग करण्यात आले. उक्त ४०४ मजुरांमधील शैक्षणीक अहर्तेनुसार कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म / पा.पु / ५९५ / २०२१, दिनांक ०१/०२/२०२१ नुसार अतिरिक्त ७ तारतंत्री, १२ अर्धकुशल, व ३८६ मजुर एकुण ४०५ असा आदेश सुधारीत करुन ४०४ मजुरांचा आदेश रद्द करण्यात आला.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/७३७/२०२०, दिनांक २९/१०/२०२० अन्वये कोविड-१९ च्या पार्श्वभुमीसाठी खरेदी केलेल्या रुग्णवाहीका, शववाहीन्यासाठी अतिरिक्त १५ वाहनचालक घेण्यात आलेले आहेत.

वाहन विभागामार्फत अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निष्कासनासाठी वाहन व मनुष्यबळासहीत ठेका होता सदरचा ठेका कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर बंद करण्यात आला होता. सदर ठेक्यातील कर्मचारी हे वरिष्ठ कार्यालयातील आदेशानुसार कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/७६१/२०२०, दिनांक १०/११/२०२० अन्वये अतिरीक्त १२७ अतिक्रमण मजुर अतिरिक्त घेण्यात आले.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/वाहन/३९८/२१, दिनांक २६/०२/२०२१ अन्वये कोविड-१९ च्या पार्श्वभुमीसाठी खरेदी केलेल्या रुग्णवाहीका, शववाहीन्यासाठी अतिरीक्त २० वाहनचालक घेण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/पा.पु/६७१/२०२१, दिनांक २६/०२/२०२१. अन्वये पाणीपुरवठा विभागातील मागणीनुसार अतिरिक्त ११ मजुर घेण्यात आले.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/१०६/२०२१, दिनांक ०५/०३/२०२१. अन्वये विद्युत विभागातील मागणीनुसार अतिरीक्त ४ कनिष्ठ अभियंता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/२१३/२०२१, दिनांक २६/०४/२०२१. अन्वये विद्युत विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त २१ तारतंत्री उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सदर अतिरीक्त तारतंत्रींना जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३६६/२१, दिनांक ३०/०६/२०२१ अन्वये माहे डिसेंबर-२०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३१३/२०२०, दिनांक ०२/०६/२०२१. अन्वये विद्युत विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त ३ तारतंत्री, ३ मजुर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३१४/२०२१, दिनांक ०२/०६/२०२१ अन्वये अतिरिक्त २ मजुर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३३४/२१, दिनांक १०/०६/२०२१ अन्वये बांधकाम विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त २ कनिष्ठ अभियंता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/वाहन/३५४/२१, दिनांक २३/०६/२०२१. अन्वये वाहन विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त १७ वाहनचालक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३७१/२१, दिनांक ०२/०७/२०२१. अन्वये वैद्यकीय आरोग्य विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त १ वैद्यकीय कनिष्ठ अभियंता उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३७२/२१, दिनांक ०२/०७/२०२१. अन्वये पाणीपुरवठा विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त २ पाणीपुरवठा मजुर पुरविण्यात आलेले आहे.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/३८१/२०-२१, दिनांक ०७/०७/२०२१ अन्वये बांधकाम विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त १ बांधकाम कनिष्ठ अभियंता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/४८४/२०२१, दिनांक २४/०८/२०२१ अन्वये वाहन विभागाच्या मागणीनुसार अतिरिक्त १५ वाहनचालक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/५२०/२०२१, दिनांक १५/०९/२०२१ अन्वये पाणीपुरवठा विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त ५ पाणीपुरवठा मजुर पुरविण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/५२४/२०२१, दिनांक १६/०९/२०२१ अन्वये अतिरीक्त १६ लिपीक टंकलेखक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/६२०/२०२१, दिनांक १०/११/२०२१ अन्वये वैद्यकीय आरोग्य विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त २ आया उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/आस्था/६४९/२१, दिनांक २३/११/२०२१ अन्वये अतिरीक्त २ मजूर करुन देण्यात आलेले आहेत.

कार्यादेश क्रमांक जा.क्र. व.वि.श.म/वाहन/२५२/२१, दिनांक २९/१०/२०२१ अन्वये वाहन विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त १८ वाहनचालक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त दिलेल्या अतिरीक्त मनुष्यबळ पुरवठा कार्यादेशानुसार खालील संवर्गात अतिरीक्त मनुष्यबळ पुरवठा संख्येत वाढ झालेली आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. २

अ.क्र	पदनाम	संख्या	अतिरिक्त संख्या	एकूण
१.	लिपिक-टंकलेखक	२४४	१६	२६०
२.	तारतंत्री	५९	३१	९०
३.	वाहन चालक	१०१	८५	१८६
४.	आया, वैद्यकिय आरोग्य विभाग	२९	२	३१
५.	मजूर	७९	१०	८९
६.	कनिष्ठ अभियंता सर्वसाधारण	१०५	८	११३
७.	घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी कुशल मनुष्यबळ	११०	१२	१२२
८.	पाणिपुरवठा मजूर		४०६	४०६
९.	अतिक्रमण मजूर		१२७	१२७
		७२७	६९७	१४२४

उपरोक्त तक्ता क्र. २ नुसार नमूद लिपिक-टंकलेखक, तारतंत्री, वाहन चालक, आया, वैद्यकिय आरोग्य विभाग, मजूर, कनिष्ठ अभियंता सर्वसाधारण, घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी कुशल मनुष्यबळ, पाणिपुरवठा मजूर, अतिक्रमण मजूर या संवर्गात तक्ता क्र. १ च्या मुळ कार्यादेशापेक्षा बाहय यंत्रणेद्धारे पुरविण्यात येणारे ६९७ मनुष्यबळ (ठेका कर्मचारी) अतिरिक्त कार्यरत आहेत. सदर कार्यरत असलेल्या अतिरिक्त ६९७ ठेका कर्मचाऱ्यांना ठेकेदारामार्फत देण्यात येणाऱ्या वेतनापोटी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय कार्योत्तर मंजूरी मिळणेकामी प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे.

निर्णय :-

वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर अभिकरणाने कामे करण्यासाठी अभिकर्त्याची नेमणुक करणेकामी प्रशासकीय ठराव क्रमांक ०६ दिनांक ०७/०७/२०२० अन्वये मान्यता घेवुन वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन आलेल्या निविदांपैकी मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट यांची ०.९९ टक्के कमी दराची निविदा मान्य करुन त्यांना प्रशासकीय ठराव क्रमांक १०८ दिनांक १८/०९/२०२० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली होती. सदर ठरावानुसार विविध संवर्गात १११९ इतके मनुष्यबळ पुरवठा करणेकामी संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देणेत आले होते. तथापी, विभागाच्या मागणीनुसार अतिरीक्त मनुष्यबळ पुरवठा करणेत आलेला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	पदनाम	संख्या	अतिरिक्त संख्या	एकूण
१.	लिपिक-टंकलेखक	२४४	१६	२६०
२.	तारतंत्री	५९	३१	९०
३.	वाहन चालक	१०१	८५	१८६
४.	आया, वैद्यकिय आरोग्य विभाग	२९	२	३१
५.	मजूर	७९	१०	८९
६.	कनिष्ठ अभियंता सर्वसाधारण	१०५	८	११३
७.	घरपट्टी, पाणीपट्टी कर वसुली कामी कुशल मनुष्यबळ	११०	१२	१२२
८.	पाणिपुरवठा मजूर		४०६	४०६
९.	अतिक्रमण मजूर		१२७	१२७
		७२७	६९७	१४२४

उपरोक्त नमुद तक्यातील विविध कार्यादेशाद्धारे वेळोवेळी नेमण्यात आलेले अतिरीक्त नमुष्यबळ व त्यापोटी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे तसेव यापुढेदेखील होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९५५ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :२७/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कोवीड लसीकरण राबविण्याकरीता २ सिसि सिरिंजेस विनानिविदा खरेदी करणेंस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी तसेच आजुबाजुच्या ग्रामीण परिसरातून रुग्ण दैनंदिन तपासणीकरिता दाखल होत असतात. सदर तपासणी करिता औषधे व साहित्यांची आवश्यकता असते. सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नियमित लसीकरण कार्यक्रम अंतर्गत कोवीड-१९ लसीकरण राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रम राबविण्याकरीता शासनाकडून आवश्यक लस व सिरिंजेसचा पुरवठा केला जातो. तथापि सद्यस्थितीत शासनामार्फत लसचा पुरवठा जास्त प्रमाणात उपलब्ध होत असून सिरिंजेस कमी प्रमाणात उपलब्ध होत आहेत. याकामी स्थानिक पातळीवर लसीकरण सुरळीत होण्याकरीता २ सिसि सिरिंजेस खरेदी करणे गरजेचे आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार FMR Code - C.7 Covid -19 Vaccination Operational Cost अंतर्गत एकूण अनुदानामधून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने २० टक्के Flexibility प्रदान करण्यात येत आहे. या माध्यमातून जिल्हास्तरावरील आवश्यकता व राज्यस्तरावरुन डिसपोजेबल सिरिंजेसचा होणारा पुरवठा विचारात घेऊन २० टक्केच्या मर्यादेत डिसपोजेबल सिरिंजेसच्या आपल्या स्तरावर खरेदीकरीता देखील मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार केंद्राकडून होणारा पुरवठा लक्षात घेऊन विहीत पध्दतीचा अवलंब करुन डिसपोजेबल २ सिसि सिरिंजेसची खरेदी करणे गरजेचे आहे. यानुसार मे. प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि, नालासोपारा (प.), मे.निओ क्यूरेस प्रा.लि., नालासोपारा (पू) व मे.धनानी फार्मा, नालासोपारा (प.) यांच्यामार्फत संदर्भ क्र.३ ते ५ अन्वये दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	साहित्याचे नाव	प्राप्त दरपत्रकाचा तपशिल	दर (सर्व करांसहित)	सर्वात कमी दर	मागणी	एकूण खर्च
१	2ml Syringe with needle	प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि	Rs.2.29/-	Rs.1.80/-	2ml X 500000	Rs.9,00,000/-
		मे.निओ क्यूरेस प्रा.लि.	Rs.1.80/-			
		मे.धनानी फार्मा	Rs.2.77/-			

सदर दरांबाबत बाजारभावाशी तुलना केली असता सदरचे दर सद्यस्थितीत कमी व वाजवी आहेत. शासनामार्फत लसचा पुरवठा जास्त प्रमाणात होत असल्याने २ सिसि सिरिंजेसची त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात तरी सदर २ सिसि सिरिंजेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास ५००००० नग २ सिसि सिरिंजेसची खरेदी करणे कामी रू.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ या वित्तिय वर्षात वसई विरार शहर महानगरपालिकेकरीता मंजूर पी.आय.पी अंतर्गत FMR Code - C.7 Covid -19 Vaccination Operational Cost या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतुदीमधून सदरचा खर्च भागवीता येणे शक्य होणार आहे

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार ५००००० नग २ सिसि सिरिंजेस विनानिविदा खरेदी करणेकामी मे.निओ क्यूरेस प्रा.लि., नालासोपारा (पू) यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रू.९,००,०००/- (अक्षरी- नऊ लाख रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८५६

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : २८/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कोव्हीड रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामान्य रुग्णालयांकरिता Rapid Antigen Test Kit विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेसे व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. मार्च २०२० पासून देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत होता. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलगीकरण कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले होते. सद्यस्थितीत श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे कोव्हीड-१९ चे रुग्ण दाखल करुन घेण्यात येतात.

सद्यस्थितीत कोरोना संशयित रुग्णांचे नमुने गोळा करुन चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय, विरार यांच्याकडे तपासणी करीता पाठविण्यात येते. सदर तपासणीचा अहवाल प्राप्त होण्याकरीता १ ते २ दिवसांचा अवधी लागतो. या कालावधीत रुग्णाला उपचार देण्यास तसेच विलगीकरण करण्यास विलंब होतो. Rapid Antigen Test Kit व्दारे रुग्णांचे नमुने तपासून त्याचा अहवाल त्वरीत देणे शक्य होतो. अशा पध्दतीने दिवसभरात अधिकाधिक नमुने तपासून रुग्णांस वेळीच उपचार देता येतो तसेच रुग्णांपासून इतरांना होणाऱ्या आजाराच्या फैलावास त्वरीत आळा घालता येणे शक्य होते. सद्यस्थितीत Rapid Antigen Test Kit व RTPCR किट कोवीड रुग्णालयांमध्ये उपलब्ध असून या किटद्वारे रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे. शासनाने कोव्हीड -१९ ची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवल्याने Rapid Antigen Test Kit त्वरीत उपलब्ध करणे गरजेचे आहे व त्याकरीता मे.फोनिक्स एसएसपीएम व्हेनचर्स, धूळे या कंपनींचे दरपत्रक कार्यालयात प्राप्त झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	नाव	दर (सर्व करांसहित)	मागणी	एकूण खर्च
१	Rapid Antigen Test Kit	रु.२४/-	१०००००	रु.२४,००,०००/-

सद्यस्थितीत कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता शासन मार्गदर्शन सुचनेनुसार साहित्य, उपकरणे इ. गोष्टी तातडीने खरेदी कराव्या लागतात. सदर वस्तुची तातडीने खरेदी करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कोवीड रुग्णालयांकरीता वरील नमुद केलेप्रमाणे Rapid Antigen Test Kit खरेदी करणे कामी एकूण रु.२४,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२१-२२ या वर्षाकरीता "रुग्णालय औषधे खरेदी" तरी सदरच्या या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार Rapid Antigen Test Kit विनानिविदा खरेदी करणेकामी मे.फोनिक्स एसएसपीएम व्हेनचर्स, धूळे यांना पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.२४,००,०००/- (अक्षरी- चोवीस लाख रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९५७ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : २७/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली विनानिविदा खरेदी करणेस व आदेश देणेकामी प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी तसेच आजुबाजुच्या ग्रामीण परिसरातून रुग्ण दैनंदिन तपासणीकरिता दाखल होत असतात. सदर तपासणी करिता औषधे व साहित्यांची आवश्यकता असते. सद्यस्थितीत कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव असल्याने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता तसेच कोविड लसिकरण दरम्यान लाभार्थीस लस दिल्यानंतर प्रत्येकास तीन दिवसांकरिता टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली देणे गरजेचे असते. परंतु सद्यस्थितीत या औषधाचा तुटवडा मोठया प्रमाणावर जाणवत आहे. महानगरपालिकेच्या मंजुर निविदेमार्फत लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन घेण्यात येतात. निविदेतील दरांच्या किंमतीत वाढ झाल्याने सदर मंजूर निविदाधारक यांनी संदर्भ क्र.२ नुसार टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली चा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. सद्यस्थितीत कोवीड रुग्णांकरीता व कोविड लसिकरण करण्यात आलेल्या लाभार्थींना टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली ची आवश्यकता आहे. तुर्तास रुग्णांकरीता सदरचे औषध मे. प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि. यांच्यामार्फत उपलब्ध करुन घेणे गरजेचे आहे. टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली मागणी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	औषधाचे नाव	मे.श्री गजानन मेडीकल स्टोअर्स	प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि	मे.फार्मा वर्ल्ड	मे.धनानी फामा	सर्वात कमी दर	मागणी	एकूण खर्च
१	टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली	रु.६५०/-	रु.६२५/-	रु.६८०/-	रु.७२०/-	रु.७००/-	१५०० X १०००	रु.१०,५०,०००/-
जी.एस.टी. १२%		रु.७८/-	रु.७५/-	रु.८१.६/-	रु.८६/-			
एकुण		रु.७२८/-	रु.७००/-	रु.७६१.६०/-	रु.८०६/-			

सदर दरांबाबत बाजारभावाशी तुलना केली असता सदरचे दर कमी व वाजवी आहेत. सद्यस्थितीत मे. प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि. यांच्याकडे टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली चा साठा उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेता सदर टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात तरी सदर औषधे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास १५०० X १००० टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली खरेदी करणे कामी रु.१०,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ सन वित्तिय वर्षाकरीता "रुग्णालय औषधे खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार टॅब. पॅरासिटॅमोल ५०० मिली विनानिविदा खरेदी करणेकामी मे. प्रनिक हेल्थकेअर डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि., नालासोपारा (प) यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१०,५०,०००/- (अक्षरी- दहा लाख पन्नास हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ८५८ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :३०/७२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती विरार (पू.) प्रभाग क्र.२४ मध्ये कपील क्लिनिक ते चाळ नं.८ पर्यंत पाईप गटार बनविणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४,७०,३५८/-

तांत्रीक मंजूरी :- कार्यकारी अभियंता दि.०४/०२/२०२०

प्रशासकीय मंजूरी :- मा.प्रभाग समिती विषय क्र.२/१० दि.२१/१२/२०१९

ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७८/२०२१ दि. १९/०३/२०२१ मा.अति.आयुक्त,(द) वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.३१/०३/२०२१

वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै.मिड डे ३) दै.आमची मुंबई
२) दै.जागृत टाईम्स

ई - टेण्डरींग व्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख:- दि.३१/०३/२०२१ दु.३.०० पासून ते दि.०८/०४/२०२१ दु.३.०० पर्यत

ई - टेण्डरींग व्दारे निविदा स्विकारण्याची तारीख:- दि.३१/०३/२०२१ दु.३.०१ पासून ते दि.०८/०४/२०२१ पर्यत

विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ६

ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- दि.१५/०४/२०२१

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) उप अभियंता ३) उप लेखापाल
२) प्र. लेखापाल ४)प्र. सहा. आयुक्त
५) उप आयुक्त,परिमंडळ-१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.अमित गणेश गांगण	-१५.००	पात्र
२.	मे.जे.डी. कंन्स्ट्रक्शन	-१४.००	पात्र
३.	मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	-१५.००	पात्र

उपरोक्त विषयाबाबत दि. ०७/०७/२०२१ च्या निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली सदर कामी ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त ३ निविदांपैकी २ निविदा धारके **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस व मे.अमित गणेश गांगण** या निविदाधारकांनी -१५.००% दराने निविदा भरलेली होती सदर निविदाधारकांना या कार्यालयाकडून अनुक्रमे जा. क्र. वविशम / बांध /प्रससी / ६४० /२०२१ व जा.क्र.वविशम/बांध/प्रससी/६४१/२०२१ दि.१४/०७/२०२१ रोजी वाटाघाटीने कमी दर बंद लिफाफा मध्ये देण्याकरीता पत्र देण्यात आले होते सदर लिफाफे दि.०१/११/२०२१ रोजी निविदा समितीपुढे उघडण्यात आले व निविदाधारक **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** यांची -१५.०१% कमी दराच्या निविदा मंजूरीस मान्यता देत आहे.

❖ **वाटाघाटी नंतरचे दर पुढीलप्रमाणे :-**

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा	वाटाघाटी नंतर दिलेले दर (अंदाजपत्रकिय दराने)
१.	**मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे**	-१५.००%	-१५.०१%
२.	**अमित गणेश गांगण**	-१५.००%	-१५.००%

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** यांची -१५.०१% दराने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** यांची -१५.०१% दराची निविदा हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि.०१/११/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** यांची -१५.०१% कमी दराची निविदेची मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(क) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचित निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग क्र.२४ मध्ये कपील क्लिनिक ते चाळ नं.८ पर्यंत पाईप गटार बनविणे या कामाच्या निविदांची तुलना करता **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे** हयांची -१५.०१% दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी जा. क्र. व वि श म /आका / ४८ /२०२१ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उप आयुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणे व सुरक्षा अनामत भरुन कार्यादेश देण्यासाठी मान्यता देत आहेत.

उप आयुक्त
परिमंडळ - १
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ९५९ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :३०/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- विरार (पू.) प्रभाग क्र.२१ मध्ये सहकारनगर रिक्षा स्टॅण्ड ते उमा शंकर पांडे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट पाथवे बनविणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :-रु. ४,०९,७२८/-

तांत्रीक मंजूरी :- मा.कार्यकारी अभियंता दि.१८/०१/२०२०

प्रशासकीय मंजूरी :- मा.प्रभाग समिती विषय क्र. २/५ दि.०७/११/२०१९

ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७८/२०२१ दि. १९/०३/२०२१ मा.अति.आयुक्त,(द) वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.३१/०३/२०२१

वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै.मिड डे ३) दै.आमची मुंबई २) दै.जागृत टाईम्स

ई - टेण्डरींग व्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख :-दि.३१/०३/२०२१ दु.३.०० पासून ते दि.०८/०४/२०२१ दु.३.०० पर्यत

ई - टेण्डरींग व्दारे निविदा स्विकारण्याची तारीख:- दि.३१/०३/२०२१ दु.३.०१ पासून ते दि.०८/०४/२०२१ पर्यत

विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ३

ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- दि.१५/०४/२०२१

ई-निविदा उघडल्या [द्वितीय लखोटा] :- दि.०८/०७/२०२१

पात्र निविदांची संख्या :- ३

निविदा उघडणारे अधिकारी :- १. उप अभियंता २. प्र.लेखापाल ३. उपमुख्य लेखा परिक्षक ४.प्र.सहा.आयुक्त ५.उप आयुक्त,परिमंडळ-१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	**मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस**	-१५.००%	पात्र
२.	**मे.चिराग विनोद पाटील**	-१३.००%	पात्र
३.	**मे.जे.डी. कंन्स्ट्रक्शन**	-१४.००%	पात्र

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** यांची -१५.००% दराने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** यांची-१५.००% दराची निविदा हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि. ०१/११/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** यांची-१५.००% कमी दराची निविदेची मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(क) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचित निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- विरार (पू.) प्रभाग क्र.२१ मध्ये सहकारनगर रिक्षा स्टॅण्ड ते उमा शंकर पांडे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट पाथवे बनविण या कामाच्या निविदांची तुलना करता मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस हयांची (-१५.००%) दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी जा. क्र. व वि श म /आका / ४८ /२०२१ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उप आयुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे.

उप आयुक्त
परिमंडळ - १
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ८६० विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :३०/३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वॉर्ड क्र.२४ मधील साईयश संकुल ते मथुरा डेरी गटाराचे बांधकाम करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :-रु. ४,१९,२७५/-
तांत्रीक मंजूरी :- कार्यकारी अभियंता दि.०४/०३/२०२१
प्रशासकीय मंजूरी :- मा.उप आयुक्त ठराव क्र. ५५१ दि.०१/०३/२०२१
ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७८/२०२१ दि. १९/०३/२०२१ मा.अति.आयुक्त,(द) वसई विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.३१/०३/२०२१
वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै.मिड डे ३) दै.आमची मुंबई २) दै.जागृत टाईम्स
ई - टेण्डरींग व्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि.३१/०३/२०२१ दु.३.०० पासून ते दि.०८/०४/२०२१ दु.३.०० पर्यत
ई - टेण्डरींग व्दारे निविदा स्विकारण्याची तारीख:- दि.३१/०३/२०२१ दु.३.०१ पासून ते दि.०८/०४/२०२१ पर्यत
विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ३
ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा):- दि.१५/०४/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) उप अभियंता ३) उप लेखापाल २) प्र. लेखापाल ४) प्र. सहा. आयुक्त ५) उप आयुक्त, परिमंडळ-१

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	शेरा
१.	मे.अमित गणेश गांगण	-१५.००	पात्र
२.	मे.जे.डी. कंन्स्ट्रक्शन	-१४.००	पात्र
३.	मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	-१५.००	पात्र

उपरोक्त विषयाबाबत दि.०७/०७/२०२१ च्या निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली सदर कामी ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त २ निविदांपैकी २ निविदा धारके **मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस** व **मे.अमित गणेश गांगण** या निविदाधारकांनी -१५.००% दराने निविदा भरलेली होती सदर

निविदाधारकांना या कार्यालयाकडून अनुक्रमे जा.क्र.वविशम/बांध/प्रससी/६४०/२०२१ व जा.क्र.वविशम/बांध/प्रससी/६४१/२०२१ अनुक्रमे दि.१४/०७/२०२१ रोजी वाटाघाटीने कमी दर बंद लिफाफा मध्ये देण्याकरीता पत्र देण्यात आले होते सदर लिफाफे दि.०१/११/२०२१ रोजी निविदा समितीपुढे उघडण्यात आले व निविदाधारक मे.**अमित गणेश गांगण** यांची -१५.०१% कमी दराच्या निविदा मंजूरीस मान्यता देत आहे.

❖ **वाटाघाटी नंतरचे दर पुढीलप्रमाणे :-**

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा	वाटाघाटी नंतर दिलेले दर (अंदाजपत्रकिय दराने)
१.	**मे.शुभलक्ष्मी एंटरप्रायजसे**	-१५.००%	-१५.००%
२.	**अमित गणेश गांगण**	-१५.००%	१५.०१%

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे.अमित गणेश गांगण** यांची -१५.०१% दराने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे.अमित गणेश गांगण** यांची -१५.०१% दराची निविदा हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

दि.०१/११/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे.अमित गणेश गांगण** यांची -१५.०१% कमी दराची निविदेची मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(क) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन **मे.अमित गणेश गांगण** यांच्या उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचित निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :- वॉर्ड क्र.२४ मधील साईयश संकुल ते मथुरा डेरी गटाराचे बांधकाम करणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी या कामाच्या निविदांची तुलना करता **मे.अमित गणेश गांगण** ह्यांची -१५.०१% दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी जा. क्र. व वि श म /आका / ४८ /२०२१ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा.उप आयुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणे व सुरक्षा अनामत भरुन कार्यादेश देण्यासाठी मान्यता देत आहेत.

उप आयुक्त
परिमंडळ - १
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसइ - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६१ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ३०/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉंटसाठी पाया उभारणे,पॅथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणे इ. करिता मा.आयुक्त साो हयांची प्रशासकिय वित्तीय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की वरुण इंडस्ट्री येथील वरुण कोव्हिड रुग्णालयामध्ये वैद्यकिय आरोग्य विभागाचे नियुक्त ठेकेदार मे.रायगड ऑक्सीजन प्रा.लि हयांचेमार्फत २०.०० MT वजनाचा एल.एम.ओ.प्लांट उभारणेत येणार आहे. सदर प्लांटमध्ये ऑक्सीजन टँकरमधून लिक्विड ऑक्सिजन भरुन पाईप मार्फत हॉस्पिटलकरीता ऑक्सिजन पुरवठा करणेत येणार आहे.

त्या अनुषंगाने लिक्विड ऑक्सिजन प्लांटकरीता आरसीसी राफ्ट बनिवणे तसेच पॅथॉलॉजी लॅब मध्ये प्लॅटफॉर्म बांधणे,सॅनॅटरी अॅरेंजमेंट करणे व वरुण इंडस्ट्रीच्या मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविण्यासाठी मा.आयुक्त सो यांनी तोंडी आदेश दिले आहेत.

सदर कामी चालू जिल्हा दरसूची सन २०१९-२० नुसार रक्कम रु.४१,९१,२१९/- किंमतीचे अंदाजपत्रक बनविणेत आले असून अंदाजपत्रकात Excavation, सोलिंग, पीसीसी, M-३० राफ्ट, M-२५ कॉलम, st.steel,composite panal ,रेलिंग इ.बाबींचा प्रामुख्याने समावेश करणेत आला आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	**वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्नालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणे .**	रु.४१,९१,२१९/-

सदर कामी होणारा खर्च

या लेखाशिर्षाकांतर्गत भागविण्यात येणार आहे.

तरी वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणे कामी बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४१,९१,२१९/- एवढ्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वय प्रशासकीय मंजुरी मिळणेस सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४१,९१,२१९/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र .९६२ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :३०/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- **वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पॅथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणेकामी नोंदणीकृत ठेकेदारामार्फत काम करुन घेणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणेकामी मा.आयुक्त साो. हयांची ठराव क्र. दि. अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर कामाची आवश्यकता लक्षात घेता एलएमओ प्लॉटसाठी आरसीसी राफ्ट बनिवणे तसेच पॅथॉलॉजी लॅब मध्ये प्लॅटफॉर्म बांधणे,सॅनॅटरी ॲरेंजमेंट करणे व वरुण इंडस्ट्रीच्या मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणेचे काम ई-निविदा प्रक्रियेने केल्यास ई-निविदा प्रक्रिये करीता लागणारा वेळ, मंजुरी व पुढील कार्यवाही करीता लागणारा कालावधी लक्षात घेता सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणीकृत ठेकेदारामार्फत करणे योग्य राहिल. त्याअनुषगांने सदर कामाकरीता **मे. निखिल शरद परब** यांनी चालू दरसुची १९-२० नुसार तयार केलेल्या रक्कम रु. ४१,९१,२१९/- अंदाजपत्रकानुसार काम करणेस तयार असलेबाबत लेखी स्वरुपात कळविले आहे.

तरी उपरोक्त काम करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता व वर नमूद केलेल्या नोंदणीकृत ठेकेदार **मे. निखिल शरद परब** हयांचे कडून राज्य दरसूची नुसार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा.आयुक्त साो. हयांचे मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई (पु) प्र.क्र ७३ मधील वरुण इंडस्ट्रीज येथील वरुण कोव्हीड रुग्णालय येथे एलएमओ प्लॉटसाठी पाया उभारणे,पथॉलॉजी लॅब बनविणे व मुख्य प्रवेश द्वारासाठी गेट व रेलिंग बनविणे कामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास व त्यानुसार होणाऱ्या रक्कम रु. ४१,९१,२१९/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नूसार निविदा न काढता सार्व.बांधकाम विभागाचे नोंदणीकृत ठेकेदार **मे. निखिल शरद परब** यांचे मार्फत राज्य दरसूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करुन घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देणेच्या पुढील अनुषंगिक कार्यावाहीस मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 963 **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक : 30/12/**2021**

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू) तुळींज हॉस्पिटल येथे 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी. पाण्याची टाकी बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिालका कार्यक्षेत्रातील (बी) नालासोपारा (पू) तुळींज हॉस्पिटल येथे 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी. पाण्याची टाकी बांधणे कामी होणाऱ्या खर्चास व निविदा मागविणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. 15/3/2021 ठराव क्र. 602 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामी दि. 15/03/2021 रोजी मा. कार्यकारी तथा शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. सदर कामाची जाहिर ई-निविदा सुचना जा.क्र. वविशम/बांध/464/2021 दि. 16/03/2021 अन्वये दै. नवराष्ट्र, दै. पुढारी, दै. महासागर, दै. पूर्णविराम, दै. खबरे आजतक, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. स्टॅण्डर्ड पोस्ट या वृत्तपत्रांमध्ये दि. 18/03/2021 रोजी प्रसिद्धीस देऊन ई- निविदा कार्यप्रणाली द्वारे निविदा दर मागविण्यात आले होते. सदर निविदेमध्ये एकच निविदाधारक प्राप्त झाल्यामुळे सदर निविदेस जा.क्र. वविशम/बांध/03/2021 दि. 05/04/2021 अन्वये दै. नवराष्ट्र, दै.पुढारी, दै.महासागर, दै. पूर्णविराम, दै. खबरे आजतक, दै. इंडीयन एक्सप्रेस, दै. स्टॅण्डर्ड पोस्ट या वृत्तपत्रांमध्ये दि. 06/04/2021 रोजी प्रथम फेर ई- निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतू सदर कामास दोनच निविदा प्राप्त झाल्याने जा.क्र. वविशम/बांध/49/2021 दि. 20/04/2021 रोजी दै. नवराष्ट्र, दै.पुढारी, दै.महासागर, दै. पूर्णविराम, दै. खबरे आजतक, दै. इंडीयन एक्सप्रेस, दै. स्टॅण्डर्ड पोस्ट या वृत्तपत्रांमध्ये दि. 22/04/2021 रोजी प्रथम फेर ई- निविदेस मुदतवाढ देण्यात आली होती. परंतू सदर कामास दोनच निविदाधारक प्राप्त झाल्याने सदर निविदेस जा.क्र. वविशम/बांध/78/2021 दि. 27/04/2021 अन्वये दै. नवराष्ट्र, दै. पुढारी, दै. महासागर, दै. पूर्णविराम, दै. खबरे आजतक, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. स्टॅण्डर्ड पोस्ट या वृत्तपत्रांमध्ये दि. 28/04/2021 रोजी द्वितीय मुदतवाढ प्रसिद्ध करण्यात आली होती.

तदनंतर सदर कामास दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर कामाअंतर्गत आर.सी.सी. पाण्याची टाकी तसेच 4 थ्या मजल्यावर शेड बनवायची असून सदर काम हे कोरोना (कोव्हीड-19) रूग्णालयाशी संबंधित व अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याने सदर काम तातडीने सुरू करणे गरजेचे असल्याने उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्राप्त 02 निविदा उघडणेस मान्यता देण्यात आली.

सदर प्राप्त 02 निविदेमध्ये मे. बाबा कंन्स्ट्रक्शन यांची 41.00% जादा दराने व मे. आफताब इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे 39.50% जादा दराने असे

निविदा दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी मे. आफताब इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे 39.50% जादा हे लघुत्तम निविदा दर आहेत. परंतू सदरचे दर निविदा दर सूचीप्रमाणे महानगरपालिकेस जास्त् वाटत असल्याने मे. आफताब इंन्फ्रास्ट्रक्चर यांना सदरचे दर कमी करणेबाबत वाटाघाटीकरीता जा.क्र.वविशम/बांध/208/2021 दि. 04/06/2021 अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने मे. आफताब इंन्फ्रास्ट्रक्चर यांनी दि. 11/06/2021 अन्वये निविदा दरामध्ये वाटाघाटी करणे शक्य नसलेबाबत कळविले आहे.

सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 55,43,065/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

तरी सदर जागेची पाहणी करून रक्कम रू. 55,43,065/- चे सन 2019-20 च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करून सदर कामी ठराव क्र 602 नुसार दि. 15/03/2021. रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तसेच मा. शहर अभियंता यांनी दि. रोजी बूक नं B. पेज नं 03/21 सन 2020-21 नुसार रक्कम रू. 55,43,065/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजूरी दिलेली आहे.

सबब वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू) तुळींज हॉस्पिटल येथे 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी. पाण्याची टाकी बांधणे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे साई प्रोमु कन्स्ट्रक्शन या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त साो. यांचे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू) तुळींज हॉस्पिटल येथे 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी. पाण्याची टाकी बांधणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे साई प्रोमु कन्स्ट्रक्शन या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय दराने काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक साो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६६४ विभाग : आस्थापना
दिनांक :३० ५२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- "कनिष्ठ अभियंता विद्युत" संवर्गातील कर्मचाऱ्यांना "उप अभियंता विद्युत" या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने पदोन्नती देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता विद्युत" संवर्गातील कर्मचाऱ्यांना "उप अभियंता विद्युत" या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने पदोन्नतीने समितीपुढे सादर केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै, २००९ रोजी झालेली आहे. त्यात वसई, विरार, नालासोपारा व नवघर माणिकपूर या चार नगरपरिषदांसह ५५ महसुली गावांचा समावेश आहे.

नगर विकास विभाग शासन निर्णय, दि. ०९/०९/२०१४ अन्वये कर्मचाऱ्यांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर केलेला असून, त्यानुसार आस्थापनेवर विविध संवर्गातील पुर्वीच्या १२४२ पदांव्यतिरिक्त नव्याने १६१० पदे अशी एकूण २८५२ पदे मंजूर झालेली आहेत. सदर मंजूर रिक्त पदे सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्यासाठी दि. ०९/०९/२०१४ च्या शासन अधिसुचनाअन्वये, "वसई विरार शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४" विहीत केलेले आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. वविम/१९२१/प्र.क्र.२१/नवि-२३ दि. २६ नोव्हेंबर २०२१ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी पुर्व अट म्हणून निम्न संवर्गात / सेवेत श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट ३ वर्षे विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ (१) नुसार दि. २०/१२/२०२१ रोजी पदोन्नती समिती गठीत केलेली असून उप अभियंता विद्युत पदावरील पदोन्नतीसाठी सदर समितीची सभा दि. २४/१२/२०२१ रोजी दु. १२.३० वाजता मा. आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या दालनात घेण्यात आली होती. त्यावेळेस खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदनाम
१	श्री. गंगाथरन डी.	मा. आयुक्त तथा अध्यक्ष पदोन्नती समिती
२	श्री. संतोष देहेरकर	मा. अति. आयुक्त तथा सदस्य पदोन्नती समिती
३	श्री. सुरेश बनसोडे	मुख्य लेखापरिक्षक तथा सदस्य पदोन्नती समिती तथा मागासवर्गीय प्रतीनिधी
४	श्री. शंकर खंदारे	उपायुक्त (आस्थापना) तथा सदस्य सचिव पदोन्नती समिती

महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम दि.०९/०९/२०१४ रोजी मंजूर झालेले आहेत. मंजूर आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमानुसार मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन यांचे कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचेकडून बिंदूनामावली रजिष्टर (Roaster) मार्च, २०१६ रोजी तपासून घेण्यात आलेली आहेत. तथापी, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दि. ०७/०५/२०२१ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत. त्यामुळे पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व पदे आरक्षणाने न भरता सेवा जेष्ठतेने भरणेची आहेत.

महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "उप अभियंता विद्युत" संवर्गातील ७ पदे मंजूर असून सदरची ७ ही पदे रिक्त आहेत.

"उप अभियंता विद्युत" पदावर पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या व आरक्षणाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

जाती / जमाती प्रवर्ग	आरक्षण टक्केवारी	आरक्षण टक्केवारी नुसार पदे	एकूण कार्यरत पदे	एकुण रिक्त पदे	सेवानिवृत्तीने रिक्त होणारी पदे	सन २०२०-२१ साठी उपलब्ध पदे (६+७)	टक्केवारी
२	३	४	५	६	७	८	९
अ.जा.	१३%	१	०	१	०	१	०.९१
अ.ज.	७%	०	०	०	०	०	०.४९
वि.जा. (अ)	३%	१	०	१	०	१	०.२१
भ.ज. (ब)	२.५०%		०		०		०.१८
भ.ज. (क)	३.५०%		०		०		०.२५
भ.ज. (ड)	२%		०		०		०.१४
विमाप्र	२%	०	०	०	०	०	०.१४
खुला प्रवर्ग	६७%	५	०	५	०	५	४.६९
एकूण	१००%	७	०	७	०	७	७.००

महानगरपालिका आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता विद्युत" संवर्गात २९ पदे मंजूर असून, शासनाचे वित्त विभागाकडील निर्णय क्र. संकिर्ण/२०१५/प्र.क्र.५७/२०१५/वि.सू.-१, दि.१४ जानेवारी, २०१६ अन्वये "उप अभियंता विद्युत" संवर्गात १०० टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत.

महानगरपालिकेने पदोन्नतीने भरलेल्या "कनिष्ठ अभियंता विद्युत" पदांचा तपशिल व आरक्षणाची स्थिती खालीलप्रमाणे होती.

अ. क्र.	तपशिल	अजा. १३%	अज. ७%	विजा(अ) ३%	भज(ब) २.५%	भज(क) ३.५%	भज(ड) २%	विमाप्र २%	खुला ६७%	एकूण
१	मंजूर पदे – १५	०२	०१	०१	००	०१	०	००	१०	१५
२	भरलेली पदे - २	-	-	-	-	-	-	-	०२	०२
३	रिक्त पदे	०२	०१	०१	००	०१	०	०	०८	१३

मा. अवर सचिव, यांचेकडील पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.१३२ए/१६ व दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ सद्या प्रलंबित असल्याने तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयान्वये अधिन राहून भरण्यात यावीत, अशी कार्यवाही करताना सेवाजेष्ठता यादी मधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री करण्याचे निर्देश आहेत.

"मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.२७९७/२०१५ वरील दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविलेले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावीत."

उक्त शासन निर्णयानुसार विचारक्षेत्रात समाविष्ठ असलेले कर्मचारी/अधिकारी हे मागासवर्गीय/खुल्या/इतर मागासवर्गाच्या प्रवर्गातील आहेत. सामान्य प्रशासन विभागाने दि. ०५/०३/२००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षणविहीत करण्यात आलेले आहे.

श्री. अमोल जाधव यांची नालासोपारा नगरपरिषदेत दि.१२/०८/९७ ठराव क्र.६७१ अनुसार कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदावर दि.१४/०८/१९९७ च्या आदेशान्वये दि.२१/०७/१९९७ पासून नियुक्ती करणेत आली. श्री. अमोल जाधव यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ दि.२१/०७/२००९ रोजी देण्यात आला असून शाखा अभियंता (विद्युत) या पदाची वेतनश्रेणी त्यांना लागू करण्यात आलेली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेस दि.०१/०१/२०१६ पासून ७ वा वेतन आयोग लागू झालेला आहे. ७ व्या वेतनआयोगास अनुसरून शासन निर्णय दि.०२/०३/२०१९ मधील नमूद तरतूदींची पूर्तता श्री. जाधव करीत आहेत. यास्तव त्यांना पुढील आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दि.२१/०७/२०१७ रोजी देय होत असून उप अभियंता या पदाची आश्वासित प्रगती योजनेकरिता आवश्यक असलेली पात्रता ते पूर्ण करीत आहेत.

सद्यस्थितीत वविशम च्या आस्थापनेवरील उप अभियंता (विद्युत) हे पद रिक्त आहे. श्री. जाधव हे जरी कनिष्ठ अभियंता असले तरी त्यांनी शाखा अभियंता या पदाची वेतनश्रेणी घेतलेली आहे/घेत आहेत. तसेच ज्येष्ठतेत देखील ते अग्रक्रमांकावर आहेत. ही बाब, तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ सन २०१७ मध्ये अनुज्ञेय होत आहे, या बाबी विचारात घेता श्री. जाधव

यांना एक विशेष बाब म्हणून उप-अभियंता या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नाही.

"कनिष्ठ अभियंता विद्युत" पदावरुन "उप अभियंता विद्युत" पदावर पदोन्नती द्यावयाच्या प्रस्तावाचा तपशिल खालीलप्रमाणे प्रशासनाने सादर केलेला आहे.

अ.क्र.	तपशिल	संवर्ग
१	ज्या संवर्गातून पदोन्नती द्यावयाची आहे तो संवर्ग/पद.	कनिष्ठ अभियंता विद्युत स्तर - एस-१४
२	ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे तो संवर्ग/पद.	उप अभियंता विद्युत स्तर - एस-२०
३	ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या, उप अभियंता विद्युत पदाची मंजूर पदसंख्या.	०७ पदे
४	सेवा प्रवेश नियमानुसार भरतीचे प्रमाण व अर्हता.	५) पदोन्नतीचे प्रमाण १००% ६) महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत शाखा अभियंता या संवर्गात किमान ०५ वर्षांचा अनुभव अथवा कनिष्ठ अभियंता या संवर्गात ०८ वर्षांचा अनुभव आवश्यक.
५	पदोन्नतीसाठी रिक्त पदे	०७
६	रिक्त पदांसाठी निश्चित केलेले आरक्षण	-
७	निम्न संवर्गासाठी प्रसिद्ध केलेली अंतीम सेवा जेष्ठता यादी	निम्न संवर्गासाठी दि. ०१/०१/२०२१ रोजीची स्थिती दर्शविणारी दिनांक /१२/२०२१ रोजीची अंतीम जेष्ठता सुची.
८	पदे व्यपगत झाली आहेत का?	पदे व्यपगत झाली नाहीत.
९	प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे	जेष्ठता सुचीसंदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत नाही.
१०	प्रलंबीत विभागीय चौकशी व इतर न्यायालयीन प्रकरणे, एसीबी प्रकरणे.	विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी न्यायालयीन प्रकरणे एसीबी प्रलंबीत असलेबाबत सोबत (जोडपत्र - क) जोडले आहे.
१०	संगणक अर्हता परिक्षा	विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे संगणक अर्हता उत्तीर्ण असल्याची कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडली आहेत. तसेच ४५ व ५० वर्षे पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना याबाबत सुट मिळालेली आहे.
११	मराठी, हिंदी भाषा परिक्षा	पदोन्नती द्यावयाचे कर्मचाही हे सर्व महाराष्ट्र शासनाच्या एसएससी प्रमाणपत्र उत्तीर्ण झालेनंतर त्यांना सदर

		उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे.
१२	मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र	विचार क्षेत्रातील जातीच्या आधारावर सेवा प्रविष्ठ असलेल्या कर्मचाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तावासोबत जोडलेल्या आहेत.
१३	संशयास्पद सचोटीबाबत	-
१४	गोपनिय अहवाल	विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसाठी विचारात घ्यावयाचे सलग ५ वर्षाचे गोपनिय अहवाल शासन निर्णय दि. ०१/११/२०११ मधील सुचना क्र. ५१ नुसार परिपुर्ण असल्याचे (परिशिष्ट-ड) सोबत जोडला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. ०१/०८/२०१९ नुसार प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने महत्वाच्या बाबी तपासून तसेच सामान्य प्रशासन दि. ०१/०२/२०२१ च्या शासन पत्रातील तपासणी सुचीनुसार सर्व कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

१. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. ०७/०५/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"मा. उच्च न्यायालय यांच्या याचीका क्रमांक २७९७/२०१५ वरील दि. ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने, मा. उच्च न्यायालयास या निर्णयास अद्याप स्थगीती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार भरण्यात यावीत."

उक्त शासन निर्णयानुसार विचार क्षेत्रात समाविष्ट असलेले कर्मचारी सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गाच्या आहेत.

२. मा. अवर सचिव, यांचेकडील पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.१३२ए/१६ व दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ सद्या प्रलंबित असल्याने तुर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयान्वये अधिन राहून भरण्यात यावीत, अशी कार्यवाही करताना सेवाजेष्ठता यादी मधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री करण्याचे निर्देश आहेत.

३. उक्त सर्व कनिष्ठ अभियंता विद्युत पदोन्नतीच्या विचार क्षेत्राच्या यादीत समाविष्ठ आहेत.

४. पदोन्नतीसाठी गोपनिय अहवालाचे निकषानुसार किमान पात्रता गुण तपासून घेण्यात आलेले आहेत.

प्रशासनाकडून सादर केलेला प्रस्ताव व दि. ०७/०५/२०२१ व दि. ०५/०३/२००२ रोजी निर्गमीत केलेले शासन निर्णय विचारात घेऊन उप अभियंता विद्युत या पदावर श्री. अमोल जाधव हे सेवाप्रवेश नियमात विहीत केलेली अर्हता धारण करीत असल्याने नियमीत पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात त्यांना उप अभियंता, विद्युत या पदावर पदोन्नती देण्याची पदोन्नती समितीने खालील विशिष्ट अटींच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे.

विशिष्ट अटी –

१) मा सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचीका क्र २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधिन राहून सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असल्याचा उल्लेख पदोन्नतीच्या आदेशात करण्यात यावा.

२) रिट पिटीशन स्टॅप नं १०८७६/२०२१ व रिट पिटीशन स्टॅप नं १०८७८/२०२१ मध्ये मा उच्च न्यायालय मुंबई यांनी २५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर पदोन्नती नमुद रिट याचीकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहील ही बाब पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

३) उक्त निवडसुची संदर्भात मा आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील.

४) पदोन्नती समितीने उप अभियंता विद्युत या नियमित कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी कर्मचाऱ्यांची सन २०२०-२१ च्या निवडसुचीसाठी शिफारस केलेली आहे.

ठराव :- तरी उपरोक्त पदोन्नती समितीची शिफारस विचारात घेता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (विद्युत) हे पद रिक्त आहे. श्री. जाधव हे जरी कनिष्ठ अभियंता असले तरी त्यांनी शाखा अभियंता या पदाची वेतनश्रेणी घेतलेली आहे/घेत आहेत. तसेच ज्येष्ठतेत देखील ते अग्रक्रमांकावर आहेत. ही बाब, तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ सन २०१७ मध्ये अनुज्ञेय होत आहे, या बाबी विचारात घेता श्री. जाधव यांना एक विशेष बाब म्हणून उप-अभियंता या पदावर पदोन्नती देण्यास हरकत नसल्याने पदोन्नती समितीची शिफारस लक्षात घेता श्री. जाधव यांचा कनिष्ठ अभियंता पदावरील अनुभव या दोन्ही बाबी लक्षात घेता श्री. अमोल जाधव हे सेवाप्रवेश नियमात विहीत केलेली अर्हता धारण करीत असल्याने त्यांना उप अभियंता, विद्युत या पदावर निव्वळ तात्पुरती पदोन्नती खालील विशिष्ट अटींना अधिन राहून देण्यात येत आहे.

विशिष्ट अटी –

१) मा सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचीका क्र २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधिन राहून सदर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असल्याचा उल्लेख पदोन्नतीच्या आदेशात करण्यात यावा.

२) रिट पिटीशन स्टॅप नं १०८७६/२०२१ व रिट पिटीशन स्टॅप नं १०८७८/२०२१ मध्ये मा उच्च न्यायालय मुंबई यांनी २५/०५/२०२१ रोजी

दिलेल्या निर्णयानुसार सदर पदोन्नती नमुद रिट याचीकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधिन राहील ही बाब पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

३) उक्त निवडसुची संदर्भात मा आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील.

४) पदोन्नती समितीने उप अभियंता विद्युत या नियमित कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यासाठी कर्मचाऱ्यांची सन २०२०-२१ च्या निवडसुचीसाठी शिफारस केलेली आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६५ विभाग : आस्थापना
दिनांक : ३१ / १२ /२०२१

प्रस्तावाचा विषय :- निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करारपद्धतीने वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील डॉ. कुश मिश्रा व इतर वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना निवासी वैद्यकीय अधिकारी व प्रभाग निहाय वैद्यकीय अधिकारी (M.B.B.S.) यांच्या रिक्त पदांवर नियमित आस्थापनेवर सामावून घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई येथील सर डी.एम.पेटीट रुग्णालयात मोठया प्रमाणावर आंतररुग्ण व बाहयरुग्ण सेवेसाठी दाखल होत असल्याने या रुग्णालयात रुग्णांना सेवा देणे कामी तसेच ८ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने असून या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शासनाने जाहीर केलेले सर्व राष्ट्रीय कार्यक्रम, नियमित लसीकरण वा बाहयरुग्ण विभाग इत्यादी कामकाजासाठी एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने याकामी महानगरपलिकेने मंजूर केलेल्या निविदाधारकाकडून मंजुर दरावर सदरचे कामकाज करणेसाठी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध होत नसल्याने व बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी हे काही काळ काम करुन सोडून जात असल्याने आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी मानधनावर उपलब्ध होणेकामी मा. सर्वसाधारण सभा यांनी ठराव क्र.१०, दि.२०.०४.२०१३ अन्वये वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावर महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या कलम ५३ (३) मधील तरतुदीनुसार थेट मुलाखतीव्दारे (Walk In Interview) भरण्यास मा. महासभेची मंजूरी दिलेनुसार वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या संवर्गामधील पदे ठोक मानधनावर भरण्यासाठी दि.२०.०५.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात क्र. वविशम/वैआवि/२२७ दि. २०.०५.२०१३ अन्वये थेट मुलाखतीनूसार अर्ज मागविण्यात आले होते.

सदर जाहिरातीव्दारे प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी करुन सदर उमेदवारांच्या मुलाखती दि.०५.०६.२०१३ व दि. १०.०२.२०१४ व वेळोवेळी घेणेत आलेनुसार मुलाखत समितीने डॉ. रमेश प्रजापती व इतर वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड केली. व त्याअनुषंगाने संदर्भ क्र.३५ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग मार्फत मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने दि. २९.१०.२०२१ रोजी डॉ. रमेश प्रजापती व इतर असे एकुण २७ आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकारी मंजूर पदावर कायमस्वरुपी नियमित आस्थापनेवर सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे मान्यतेकरिता पाठविण्यात आला आहे.

माहे ऑगस्ट,२०१३ चा दर ६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आलेवर वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना वेळोवेळी १ दिवसाचा खंड देऊन त्यांना मा. महासभेची वेळोवेळी मंजूरी घेऊन वेळोवेळी वर्तमान पत्रात प्रसिद्धी देऊन वेळोवेळी थेट मुलाखती घेऊन यानुसार निवड करुन वेळोवेळी नियुक्ती आदेश दिलेले आहेत.

तसेच वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना निवासी वैद्यकीय अधिकारी (M.B.B.S.) यांच्या रिक्त पदांवर समायोजन करुन घेणेबाबतचे निवेदन दि.२२-११-२०२१ रोजी मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना सादर केले आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेची दिनांक ०९.०९.२०१४ रोजीच्या मंजूर आकृतीबंधान्वये निवासी वैद्यकीय अधिकारी यांची ४७ पदे तसेच प्रभाग निहाय वैद्यकीय अधिकारीची ०९ अशी एकुण ५६ पदे मंजूर असून २०१३ पासून ते २०१७ पर्यंत वारंवार जाहिरात देऊन सुद्धा सद्यस्थितीत ०३ वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस म्हणून कंत्राटी पद्धतीने सहा महिन्याच्या करार तत्वावर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता कार्यरत आहेत.

(अ) निवासी वैद्यकीय अधिकारी (४७ पदे) व प्रभाग निहाय वैद्यकीय अधिकारी (०९ पदे) यांच्या एकुण ५६ पदांपैकी ५३ पदे ही रिक्त असून वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) हे सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना RTR १०९१/पृ.क्र.२२६/सेवा ३

दि.३०/१०/२००० अन्वये नियम ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांच्या एकुण पदापैकी ३३% पदे ही वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) म्हणजेच एकुण १८ पदे भरणे अपेक्षित आहे.

(ब) सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना RTR १०९१/पृ.क्र.२२६/सेवा ३ दि.३०/१०/२००० अन्वये नियम ५ मध्ये नियम क्र.३ मधील खंड (क) मध्ये नमुद केलेप्रमाणे तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना मवैअ २०११/पृ.क्र.७७/सेवा ३ (नि.मं) दि.०२/११/२०११ अन्वये नमुद केलेप्रमाणे अर्हता धारण केलेले आवश्यक संख्याइतके उमेदवार नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे ही इतर लायक उमेदवारांमधून भरली जातील असे नमुद केलेले आहे. म्हणजेच उपलब्ध लायक उमेदवार म्हणजेच वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) असे गृहीत धरुन रिक्त पदे ५३ मधून उपरोक्त (अ) मध्ये नमुद १८ पदे कमी केले असता शिल्लक ३५ पदांवर इतर लायक वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) भरणे अपेक्षित आहे. (सोबत उर्वरीत ४७ वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची सेवा जेष्ठता यादी जोडत आहोत.)

अ.क्र.	नाव	संवर्ग	नियुक्ती दिनांक
१.	डॉ. कुश बंशनारायण मिश्रा	खुला	१२-०३-२०१४
२.	डॉ. पंडीतराव प्रेमचंद राठोड	विजा-अ	१४-०३-२०१४
३.	डॉ. अंकिता नरेंद्र संखे	भज-ड	२८-०८-२०१४
४.	डॉ. स्नेहल गणपत संखे	भज-ड	०१-०९-२०१४
५.	डॉ. क्रमिका शरद चौधरी	इमाव	०१-०९-२०१४
६.	डॉ. धनंजय कामेश्वरराम विश्वकर्मा	खुला	०१-०९-२०१४
७.	डॉ. तृप्ती प्रविण कोकाटे	इमाव	०३-०९-२०१४
८.	डॉ. प्रियांका पंढरीनाथ पाटील	इमाव	०३-०९-२०१४
९.	डॉ. योगिता प्रदीप जुवाटकर	खुला	०४-०९-२०१४
१०.	डॉ. शाहीन जमीर शेख	खुला	०९-०९-२०१४
११.	डॉ. निलेश हरीभाऊ मेहेर	इमाव	१५-०९-२०१४
१२.	डॉ. संपत सत्या वळवी	अज	१९-०३-२०१५
१३.	डॉ. प्रिया मोतिराम पाडवी	अज	२०-०३-२०१५
१४.	डॉ. मंगेश रामराव टेकाम	अज	२३-०३-२०१५
१५.	डॉ. धनश्री शरद सांळुखे	खुला	१४-०९-२०१५
१६.	डॉ. सुरेश सोहनलाल राठोड	खुला	१४-०९-२०१५
१७.	डॉ. धनश्री नामदेव पवार	इमाव	१४-०९-२०१५
१८.	डॉ. वंदना प्रल्हाद वसईकर	अजा	१५-०९-२०१५
१९.	डॉ. परेश बळीराम जाधव	इमाव	१५-०९-२०१५
२०.	डॉ. मिताली नरेश गवळी	इमाव	१५-०९-२०१५
२१.	डॉ. अर्चना साबरसिंग वसावे	अज	१५-०९-२०१५
२२.	डॉ. सुम्मी कासीम शेख	इमाव	१६-०९-२०१५
२३.	डॉ. गौरव लक्ष्मण वाघ	भज-ब	१८-०९-२०१५
२४.	डॉ. रिद्धी अशोक पाटील	इमाव	१९-०९-२०१५
२५.	डॉ. प्रियांक पितांबर भोळे	खुला	२२-०९-२०१५
२६.	डॉ. भाग्यश्री प्रियांक भोळे	खुला	२२-०९-२०१५
२७.	डॉ. सुनिता भिखाराम पटेल	खुला	२२-०९-२०१५
२८.	डॉ. अनया अभिजित देव	अजा	२३-०९-२०१५
२९.	डॉ. अस्लम गुलाब शेख	खुला	२९-०९-२०१५
३०.	डॉ. रवीकुमार चिंतामण गायकवाड	अज	२९-०९-२०१५
३१.	डॉ. किरण प्रभाकर काळे	खुला	०३-१०-२०१६
३२.	डॉ. मनाली हेमंत तरे	विमाप्र	०३-१०-२०१६
३३.	डॉ. मनोहर पांडूरंग निंबाळकर	इमाव	०५-१०-२०१६

३४.	डॉ. संजयकुमार किशन पाईकराव	अजा	०५-१०-२०१६
३५.	डॉ. सुनिता रोशन आडे	विजा-अ	१०-०६-२०१७
३६.	डॉ. नमिता रविंद्र व्यापारी	भज-ब	१३-०६-२०१७
३७.	डॉ. अंकुश संभाजीराव मिजगर	भज-क	१३-०६-२०१७
३८.	डॉ. मिनल योगेश बंडगर	भज-क	१३-०६-२०१७
३९.	डॉ. विलास प्रल्हाद तोंडे	खुला	१३-०६-२०१७
४०.	डॉ. हिना सुधाकर चवणे	विमाप्र	२१-०७-२०१७
४१.	डॉ. सुधीर कुंडलिक कांबळे	अजा	२३-१०-२०१७
४२.	डॉ. लक्ष्मण गंगाराम शेळके	अज	२३-१०-२०१७
४३.	डॉ. सचिन दादासाहेब माने	विमाप्र	२३-१०-२०१७
४४.	डॉ. मारुती अश्रोबा मोरे	खुला	१४-०८-२०१८
४५.	डॉ. अजरा शरफुद्दीन शेख	खुला	१४-०८-२०१८
४६.	डॉ. विजय जनार्दन दराडे	भज-क	१४-०८-२०१८
४७.	डॉ. स्मिता चंद्रहास चंदनशिवे	अजा	१४-०८-२०१८

डॉ. कुश मिश्रा व इतर वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची (सोबतच्या यादीनुसार) निवड समितीव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करारपद्धतीने ठोक मानधनावर ६ महिन्यासाठी नेमणूक करण्यात आलेनुसार या त्यांचे शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्राच्या छायाप्रती यासोबत सादर करीत आहोत.

तरी उक्त वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांनी कोव्हिड-१९ च्या संपूर्ण काळात जीवाची पर्वा न करता प्रामाणिकपणे रुग्णसेवा दिली असून त्यांच्या महानगरपालिकेतील सेवा व अनुभवाचा फायदा महानगरपालिकेस होणार आहे. सदर उक्त वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांच्या नेमणूका कंत्राटी पद्धतीने ६ महिन्याच्या कालावधीसाठी वृत्त पत्रात जाहीरात देवून निवड समिती मार्फत मुलाखती घेवून झाल्याने त्यांच्या नियुक्तीबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वरील वैद्यकीय आरोग्य विभागाकडील प्रस्तावाचे अवलोकन केले असता वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागात कामाच्या दृष्टीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (३) नुसार सहा महिन्याचे कंत्राटी पद्धतीने आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका सन २०१३ पासुन घेण्यात येत आहेत.

सदर नेमणूका हया वृत्तपत्रात जाहीरात देवून व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४ मध्ये विहीत केलेल्यानुसार निवड समिती गठीत करुन निवड समिती मार्फत आयुर्वेदीक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत.

वसई विरार शहर महानगपालिकेचा सुधारित आकृतीबंध दि.०९ सप्टेंबर,२०१४ रोजी मंजूर आहे. त्यात वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची ४७ पदे मंजूर आहेत. तसेच प्रभाग निहाय वैद्यकीय अधिकारीची ०९ अशी एकुण ५६ पदे मंजूर असून २०१३ पासून ते २०१७ पर्यंत वारंवार जाहिरात देऊन सुद्धा सद्यस्थितीत ०३ वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस म्हणून कंत्राटी पद्धतीने सहा महिन्याच्या करार तत्वावर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता कार्यरत आहेत. त्यांचा प्रस्ताव मा. शासनाकडे दि.२५-१०-२०२१ रोजी पाठविण्यात आला आहे. तसेच उर्वरित दोन समकक्ष एम.बी.बी.एस. यांचा प्रस्ताव मा. शासनाकडे दि.२२-१२-२०२१ रोजी पाठविण्यात आला आहे. याअनुषंगाने या एकुण ५६ पदांपैकी ५१ पदे ही रिक्त असून वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) हे सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना RTR १०९१/पृ.क्र.२२६/सेवा ३ दि.३०-१०-२००० अन्वये नियम ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांच्या एकुण पदापैकी ३३% पदे ही वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) म्हणजेच एकुण १८ पदे भरणे अपेक्षित आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्र.१३२३/२०२० च्या अनुषंगाने दि. ०६ जुलै, २०२१ च्या शासन निर्णयानुसार सदर ५६ वैद्यकीय अधिकारी यांचे आरक्षण पुढीलप्रमाणे होत आहे.

एकूण मंजूर पदे-५६ आरक्षित पदे (३३%)- १८ रिक्त पदे - ३३

पदाचे नाव	मंजूर पद संख्या	अ.जा	अ.ज	वि.जा.अ	भ.ज.ब	भ.ज.क	भ.ज.ड	विमाप्र	इमाव	इडब्ल्युएस	खुला
वैद्यकीय अधिकारी M.B.B.S.	५६	७	४	२	१	२	१	१	११	६	२१
भरलेली पदे (मा.शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावानुसार)	५	१	०	०	०	०	०	०	१	०	३
रिक्त पदे	५१	६	४	२	१	२	१	१	१०	६	१८
वैद्यकीय अधिकारी B.A.M.S. (३३%)	१८	२	१	१	०	१	०	०	४	२	७
शिल्लक	३३	४	३	१	१	१	१	१	६	४	११

हया १८ वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांची निवड समितीव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने सहा महिन्यासाठी नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

सदर नेमणूकांना एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन वेळोवेळी मुदतवाढी अथवा फेर मुलाखती घेवून निवड केल्याचे दिसून येते.

१. डॉ. कुश बंशनारायण मिश्रा यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,९ महिने इतका डॉ. धनंजय कामेश्वरराम विश्वकर्मा, डॉ. योगिता प्रदीप जुवाटकर व डॉ. शाहीन जमीर शेख यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,३ महिने इतका, डॉ. प्रिया मोतिराम पाडवी यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ६ वर्षे,९ महिने इतका, डॉ. धनश्री शरद साळुंखे व डॉ. सुरेश सोहनलाल राठोड यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ६ वर्षे,३ महिने इतका असून ते खुल्या या प्रवर्गातील आहेत.

२. डॉ. वंदना प्रल्हाद वसईकर व डॉ. अनया अभिजित देव वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ६ वर्षे,३ महिने इतका असून ते अनूसुचित जाती या प्रवर्गातील आहेत.

३. डॉ. संपत सत्या वळवी यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ६ वर्षे,९ महिने इतका असून ते अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत.

४. डॉ. पंडीतराव प्रेमचंद राठोड यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे, ९ महिने इतका असून ते वि.जा.-अ या प्रवर्गातील आहेत.

५. डॉ. अंकिता नरेंद्र संखे यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे, ४ महिने इतका असून ते भ.ज.ड या प्रवर्गातील आहेत. (भ.ज.क या बिंदुवर आळीपाळीने)

६. डॉ.क्रमिका शरद चौधरी, डॉ. तृप्ती प्रविण कोकाटे, डॉ. प्रियांका पंढरीनाथ पाटील व डॉ. निलेश हरीभाऊ मेहेर यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे, ३ महिने इतका असून ते इतर मागास वर्गीय या प्रवर्गातील आहेत.

७. डॉ. स्नेहल गणपत संखे यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ७ वर्षे,३ महिने व डॉ. मंगेश रामराव टेकास यांचा वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) या पदावरील एकूण कालावधी ६ वर्षे, ९ महिने इतका असून ते इ.डब्ल्यु.एस. या प्रवर्गातील आहेत.

वसई विरार शहर महानगपालिकेचा सुधारित आकृतीबंध दि.०९ सप्टेंबर,२०१४ रोजीच्या शासन निर्णय क्र.ववि‌म-१९११/प्र.क्र६४९/नवि-२३, दि.०९ सप्टेंबर,२०१४ परिशिष्ट-अ च्या सहपत्रात पृ.क्र.०८ वर एकुण ०९ वैद्यकीय अधिकारी मंजुर आहेत. तसेच शासन निर्णय क्र.ववि‌म-१९११/प्र.क्र६४९/नवि-२३, दि.०९ सप्टेंबर,२०१४ परिशिष्ट-अ च्या सहपत्र क्र.४३ मध्ये पृ.क्र.५५ वर निवासी वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची एकुण ४७ पदे मंजूर आहेत. अशी एकुण ५६ पदे मंजूर असून २०१४ पासून ते २०१७ पर्यंत वारंवार जाहिरात देऊन सुद्धा सद्यस्थितीत ०५ वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस म्हणून कंत्राटी पद्धतीने सहा महिन्याच्या करार तत्वावर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीकरिता कार्यरत आहेत. याअनुषंगाने या एकुण ५६ पदांपैकी ५१ पदे ही रिक्त असून वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) हे सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना RTR १०९१/पृ.क्र.२२६/सेवा ३ दि.३०/१०/२००० अन्वये नियम ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांच्या एकुण पदापैकी ३३% पदे ही वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) म्हणजेच एकुण १८ पदे भरणे अपेक्षित आहे.

नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. नमुंम-१२२१/प्र.क्र.०७/नवि-२८ दि.२७ जुलै,२०२१ अन्वये नवि मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करार पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावयाचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याच धर्तीत उक्त वसई विरार शहर महानगरपालिकेतील १८ वैद्यकीय अधिकारी (B.A.M.S.) यांना महानगरपालिकेत सामावून घेणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी-०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५० २५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ९६६

विभाग :- विधी
दिनांक :- ३१/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर अतिरिक्त वकीलांची तीन वर्षाकरीता नेमणूक करणेबाबत .

प्रस्तावाचा मजकुर :-

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर अतिरिक्त वकील व सिनियर काऊंसिलर यांची तीन वर्षाकरीता नेमणूक करणे तसेच विधी पॅनलवरील वकिलांना सुधारित फी चे दर लागु करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र.२२२ दि.१४/०६/२०२१ रोजीने मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर पुढीलप्रमाणे अतिरिक्त वकील/सिनियर काऊंसिलर यांची नेमणूक करावयाची आहे;

अ.क्र.	मा.न्यायालयाचे नाव	वकील व सिनियर काऊंसिल ची संख्या
१.	मा.उच्च न्यायालय (High Court)	दोन वकील व एक सिनियर काऊंसिल
२.	मा.कामगार व औद्योगिक न्यायालय (Labour & Industrial Court)	एक वकील
३.	मा.मानवी हक्क आयोग (Human Rights)	एक वकील
४.	मा.झोपडपट्टी न्यायधिकरण (Slum Tribunal)	एक वकील
५.	मा.ग्राहक विवाद निवारण आयोग (Consumer Disputes Redressal Commission)	एक वकील
६.	मा.राष्ट्रीय हरित न्यायधिकरण (National Green Tribunal)	एक वकील
७.	मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायधिकरण (National Company Law Tribunal)	एक वकील
८.	मा.मोटार अपघात दावा न्यायधिकरण (Motor Accidents Claims Tribunal)	एक वकील
९.	मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण (Maharashtra Administrative Tribunal)	एक वकील
१०.	मा.वसई न्यायालय (Vasai Court)	एक वकील

वरीलप्रमाणे वकील/सिनियर काऊंसिलर यांची महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर तीन वर्षाकरीता नियुक्ती करण्याच्या दृष्टीने त्यांना लागू दर, अटी शर्ती, अर्जाचा नमुना तसेच जाहिर सुचना जावक क्र.वविशम/विधी/३०/२०२१ दि.२९/०६/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन तसेच जाहिर सुचना दि.३०/०६/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रांत (लोकमत, लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, इकोनॉमिक टाईम्स, नरविर चिमाजी) प्रसिध्दी देऊन दि.१५/०७/२०२१ रोजी सायं.४.00 पर्यत इच्छूक वकीलांची निवेदने मागविणेत आलेली होती. सदरील जाहिर सुचनेस मा.आयुक्त सो. यांचे दि.१६/०७/२०२१ रोजीच्या मान्यतेने दि.२६/०७/२०२१ रोजी पर्यत मुदतवाढ घेण्यात आलेली होती. त्यानुसार लागू दर, अटी-शर्ती, अर्जाचा नमुना तसेच जाहिर सुचना (प्रथम मुदतवाढ) जा.क्र.वविशम/विधी/४६/२०२१ दि.१६/०७/२०२१ अन्वये महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन तसेच जाहिर सुचना (प्रथम मुदतवाढ) दि.१७/०७/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रांत (लोकमत, लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, इकोनॉमिक टाईम्स, नरविर चिमाजी) प्रसिध्दी देऊन दि.२६/०७/२०२१ रोजी सायं.४.00 पर्यत इच्छूक वकीलांची विहित नमुन्यात कागदपत्रांसहित निवेदने मागविणेत आलेली होती.

सदर निविदेच्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर नेमणूक करणेकामी विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या अर्जावर जाहिर सुचनेतील अटी व शर्तीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन पात्र उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती घेणेकामी मा. आयुक्त महोदय यांनी खालीलप्रमाणे निवड समिती गठीत केलेली आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	पदनाम	समिती पद
१.	श्री.संतोष देहेरकर	अति.आयुक्त (विधी)	अध्यक्ष
२.	श्री.अजिंक्य बगाडे	उप-आयुक्त (विधी)	सदस्य
३.	श्री.विश्वनाथ तळेकर	प्र.सहा.आयुक्त (विधी)	सदस्य सचिव
४.	ॲड.स्वाती देसाई (सावंत)	विधी सल्लागार	सदस्य

त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालीकेच्या विधी पॅनलवर वकील म्हणुन तीन वर्षाकरीता नेमणुक करणे कामी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून पात्र उमेदवारांच्या ऑनलाईन पदधतीने मुलाखती घेणे बाबत दि.११/१०/२०२१ रोजी विधी पॅनल निवड समीतीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये छाननी प्रक्रियेत एकुण १२0 अर्जापैकी ८0 उमेदवारांना पात्र ठरविण्यात आले. पात्र ठरणारे उमेदवारांच्या ऑनलाईन ऐवजी थेट पदधतीने मुलाखती दि.२८/१०/२०२१ व दि.२९/१०/२०२१ रोजी घेण्याचे ठरले. थेट मुलाखतीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांना पत्र देऊन मुलाखतीसाठी निमंत्रित करण्यात आलेले होते. परंतु पात्र ८0 ऐवजी ८३ उमेदवारांना नजरचुकीने मुलाखतीचे पत्र देण्यात आले. त्यापैकी ॲड.पवन कुमार उदयशंकर तिवारी ॲड.विनय देवनाथ पाटील व ॲड.प्रदिप दुधमल भवरे असे ३ उमेदवारांना समितीने ११/१०/२०२१ रोजीच्या बैठकीत अपात्र ठरविले होते परंतु नजरचुकीने त्यांना मुलखतीचे पत्र गेल्यामुळे निवड समीतीने **जरी सदर उमेदवार मुलाखतीस आले तरी त्यांना अपात्र ठरविण्याचे** मुलाखतीस सुरूवात करणेपुर्वीच निश्चित करण्यात आले. त्यास अनुसरून दि.२८/१०/२०२१ रोजीच्या मुलाखतीस २९ उमेदवार व दि.२९/१०/२०२१ रोजीच्या मुलाखतीस ३२ उमेदवार असे एकुण ६१ उमेदवार मुलाखतीस उपस्थित होते. मुलाखतीस उपस्थित उमेदवारापैकी ॲड.विनय देवनाथ पाटील व ॲड.प्रदिप दुधमल भवरे असे २ अपात्र उमेदवार देखिल मुलाखतीस उपस्थीत होते व ठरल्याप्रमाणे त्यांना मुलाखतीतही अपात्र ठरविण्यात आले. मुलाखतीस उपस्थित राहिलेल्या उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार विधि पॅनल निवड समीती सदस्यांनी गुणांकन दिलेले असुन सदर गुणांना एकत्रिकरण करून गुणांकन

यादी तयार करणेत आली आहे. सदर यादीवर विचारविनिमय करून प्राप्त गुणानुसार तसेच मा.न्यायालय निहाय उमेदवारांची निवड करणेकामी दि. २२/११/२०२१ रोजी विधी पॅनल निवड समीतीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत मुलाखतीमध्ये उमेदवारांना प्राप्त झालेले एकत्रित गुणांची यादीची पडताळणी करण्यात आली. त्यानुसार जास्त गुणांकन संपादन करणारे उमेदवार तसेच उमेदवारांनी त्यांचे अर्जामध्ये निवडलेला न्यायालय/न्यायाधिकरणाचा पर्याय या सर्व बाबींचा विचार करून विधी पॅनल निवड समितीने खालील प्रमाणे न्यायालय/न्यायाधिकरण निहाय उमेदवारांच्या अंतीम निवडीस शिफारस केलेली आहे;

अ. क्र.	मा.न्यायालयाचे नाव	निवड समीतीने शिफारस केलेल्या वकीलाचे / उमेदवाराचे नाव
१.	मा.उच्च न्यायालय (High Court)	ॲड.तानाजी विठ्ठल म्हातुगडे
२.	मा.उच्च न्यायालय (High Court)	ॲड.विश्वनाथ रामचंद्र पाटील
३.	मा.कामगार व औद्योगिक न्यायालय (Labour & Industrial Court)	ॲड.रूपाली प्रविण देशपांडे - कमलापूरकर
४.	मा.मानवी हक्क आयोग (Human Rights Commission)	ॲड.विनित अविनाश कुलकर्णी
५.	मा.झोपडपट्टी न्यायधिकरण (Slum Tribunal)	ॲड.निखील वसंत चव्हाण
६.	मा.ग्राहक विवाद निवारण आयोग (Consumer Disputes Redressal Commission)	ॲड.पंकज पोपटराव देवकर
७.	मा.राष्ट्रीय हरित न्यायधिकरण (National Green Tribunal)	ॲड.प्रशांत प्रकाश मोरे
८.	मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायधिकरण (National Company Law Tribunal)	ॲड.पुजा मकरंद जोशीदेशपांडे
९.	मा.मोटार अपघात दावा न्यायधिकरण (Motor Accidents Claims Tribunal)	ॲड.दिपक श्रीराम किलजे
१०.	मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण (Maharashtra Administrative Tribunal)	ॲड.सुभाषचंद्र भगवानराव पवार

उपरोक्त न्यायालय/न्यायाधिकरणांकरीता नेमणूकी व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर मा.वसई न्यायालयासाठी वकीलांची निवड करणेत आलेली नाही. निवड समीतीस मुलाखती दरम्यान मुलाखत घेतलेल्या उमेदवारांपैकी मा.वसई न्यायालयासाठी पात्र उमेदवार निदर्शनास न आलेमुळे मा.वसई न्यायालयासाठी उमेदवार निवड करण्यांत आलेला नाही. करीता मा.वसई न्यायालयासाठी पुन:श्च जाहीर सुचनेस प्रसिध्दी देऊन उमेदवारांना मुलाखतीस बोलवुन उमेदवार निवड करण्याची सुचना विधी पॅनल निवड समीतीने केलेली आहे.

तरी विधी पॅनल निवड समीतीने उपरोक्त प्रमाणे मा.न्यायालय/न्यायाधिकरण निहाय निवड केलेल्या उमेदवारांची महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर **"वकील"** म्हणून तीन वर्षांकरीता नेमणूक अंतिम करून त्यांना नेमणूक आदेश देणे, मंजुर दरानुसार त्यांचे प्राप्त होणारे देयके अदा करणेस मंजूरी मिळावी तसेच मा. दिवाणी न्यायालयाकरिता अतिरिक्त ३ वकील व राष्ट्रीय हरीत लवादाकरिता अतिरिक्त १ वकील नियुक्त करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन निवड प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर.

.....

<u>ठराव</u> :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर वकील नेमणूक करणेबाबतच्या प्रस्तावाचे वाचन करण्यात आले. प्रस्तावात नमुद केलेल्या विविध मा. न्यायालयांकरिता विधी पॅनल निवड समितीने वकीलांची केलेली निवड प्रक्रिया करुन पॅनल वकील म्हणून शिफारस केलेली आहे. सदर निवड यादीस व निवड केलेल्या वकीलांसमवेत करारनामा करुन कार्यादेश देणेस तसेच मंजूर दरानुसार त्यांचे वेळोवेळी प्राप्त होणारे देयक अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा. दिवाणी न्यायालयाकरिता अतिरिक्त ३ वकील व राष्ट्रीय हरीत लवादाकरिता अतिरिक्त १ वकील नियुक्त करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन निवड प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्यकार्यालय विरार

प्रशासकीय ठराव क्र. :- ९६७ **विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
दिनांक :- ३१/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेस कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनाचे पुन:प्रमाणित (Re-Certification) करणेकरिता व स्वयंघोषित करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका मा. प्रशासकिय ठराव क्र.८६७, दिनांक १०/१२/२०२१ अन्वये वसई-विरार शहरास कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनाचे पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करण्यास प्राथमिक ठराव मंजूर करण्यात आला होता.

तदनंतर सदर ठरावाच्या अनुषंगाने कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनाचे पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करण्यास दिनांक १६/१२/२०२१ रोजी दैनिक आमची मुंबई व नरविर चिमाजी या दोन वृत्तपत्रा द्वारे नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यात आल्याहोत्या. तथा दिलेल्या कालावधित कोणत्याही हरकती/सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्र कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (3Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनाचे पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करणेकरिता अंतिम ठराव घेणे आवश्यक आहे.

सदर कामी दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत अंतिम ठराव पारित करुन शहरास '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनाचे पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करण्याचा अंतिम ठराव व घोषणा पत्र राज्य शासनास पाठविणे आवश्यक आहे.

तरी "स्वच्छ भारत अभियान" स्वच्छ सर्वेक्षण २०२२ करिता वसई-विरार शहरास '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) यांचे पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करणेकरिता अंतिम ठरावाच्या मसुद्यास प्रशासकिय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर करण्यास शिफारस आहे.

ठराव निर्णय :- उपरोक्त विषयाबाबत असे ठरविण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेने केलेली प्रत्यक्ष कार्यवाही व कामगिरी पाहता शहराला कचरा मुक्त शहर (GFC) '३' तारांकित मानांकन (3 Star Rating) व हागणदारी मुक्त (ODF++) मानांकनासाठी पुन:प्रमाणित (Re-Certification) व स्वयंघोषित करणे करिता प्रस्ताव मंजुर करुन राज्य शासनास पुढिल कार्यवाहिसाठी पाठविणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३१।१२।२०२१

(गंगाथरन डी.)
प्रशासक/आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार

प्रशासकीय ठराव क्र. :- ९६८ **विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
दिनांक :- ३१/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत अभियान -2 अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ वसई-विरार मिशन यशस्वीपणे राबविणेकरिता स्वच्छता स्पर्धा (Greeinowar Event-3) 2021-22 आयोजित करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यांत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान-२ अंतर्गत होणा-या स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये भाग घेत आहे. सदर सर्वेक्षण संदर्भात शासनाकडून सर्वेक्षण२०२२ चे मार्गदर्शिका (Toolkit) प्राप्त झाली आहे. या मार्गदर्शिका मध्ये स्वच्छ तंत्रज्ञान आव्हान (Swachh Technology Challenge), लघूगीत (Jingle), लघूचित्रपट (Short Film), पोस्टर/ चित्रकला, भित्ती चित्रे (म्यूरल/वॉल पेंटीग) व पथनाट्य स्पर्धा राबविणेकरिता सुचना प्राप्त आहेत. तसेच शहरात "स्वच्छ बदल" घडवून आणणाऱ्या नागरीक / संस्था / महानगरपालिकेतील कर्मचारी अथवा सफाई कामगार यांना स्वच्छता चॅम्पीयन म्हणून गौरविणे व स्वच्छ हॉटेल, स्वच्छ शाळा, स्वच्छ रुग्णालय, स्वच्छ गृहनिर्माण संस्था/चाळ, स्वच्छ शासकिय कार्यालय आणि स्वच्छ बाजार यांची निवड करुन या संस्थेस गौरविणे अशा सुचना मार्गदर्शिकेत प्राप्त आहेत. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ वरील सर्व कार्यक्रम राबविणेकरिता 'Citizen Engagement' या घटका अंतर्गत एकुण ६२५ गुण आहेत.

त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील उद्योजक (Enterpreneurs), धार्मिक संस्था (Religious Institutions), नागरी समाज (Voluntary Organisations/Civil socities), गृह निर्माण संस्था/ चाळ (Residential Welfare Association/ Mohalla), अशासकिय संस्था (NGO), स्वयंसेवी संस्था/ बचत गट (Self Help Group), व्यवसाईक सामाजिक जबाबदारीने पुढाकार घेणाऱ्या संस्था (Coroporate Social Responsibility), सफाई कामगार (Sanitary Workers), वैद्यकिय आरोग्य कर्मचारी (Medical health worker), शाळा (School), हॉटेल (Hotel), रुग्णालय (Hospital), सरकारी कार्यालय (Government Office) या सर्व गटांमध्ये स्वच्छता स्पर्धेचे आयोजन करणे आवश्यक आहे. सदर स्वच्छता स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता उक्त संस्थांना दि. २२/१२/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१ या कालावधीत संबंधीत विभाग कार्यालयात अर्ज करता येणार आहे. सदर स्पर्धांच्या गुणांकन करणेकरिता निकष निश्चय करण्यांत आले असुन त्यामध्ये प्रामुख्याने कचरा वर्गीकरण (Source Segregation), कच-यावर पुनर्प्रक्रिया करणे, कचऱ्या पासून पुर्ननिर्मिती करणे, शौचालय व्यवस्थापन, प्लास्टिक बंदी/प्लास्टिक निमूर्लन मोहिम, शून्य कचरा (कचरा कमी निर्माण करणे), झोपडपट्टी सुशोभिकरण करणे/ कचरा मुक्त करणे संबंधित कामे इत्यादी स्वच्छता विषयक पायाभुत या बाबींवर भर देण्यात आलेला आहे.

सदर स्वच्छता स्पर्धेचे प्रत्यक्ष स्थळ परिक्षण व गुणाकंन दिनांक ०३/०१/२०२२ ते दि.०७/०१/२०२२ या कालावधीत करण्यात येईल. त्याअंतर्गत वरील स्पर्धाकांना देण्यात येणा-या बक्षीसांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	स्पर्धा	पात्रता	प्रथम पारितोषिक	द्वितीय पारितोषिक	तृतीय पारितोषिक	प्रशस्तिपत्रक
१.	स्वच्छता चॅम्पियन (स्वच्छता संबंधित कामे / योगदान)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation/	१०,०००	७,५००	५,०००	✓
		महानगरपालिकेतील कर्मचारी अथवा सफाई कामगार)	-	-	-	✓
२.	लघुगीत स्पर्धा (Audio/Video Jingle Making)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation)	१०,०००	७,५००	५,०००	✓

३.	लघूचित्रपट स्पर्धा (Short Movie Making)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation)	१०,०००	७,५००	५,०००	✓
४.	चित्रकला /पोस्टर स्पर्धा (Drawing/Poster Making)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation) वयो मर्यादा 15 वर्षापर्यंत	१०,०००	७,५००	५,०००	✓
		कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation) वयो मर्यादा 15 वर्षावरील	१०,०००	७,५००	५,०००	✓
५.	भित्ती चित्रकला (Murals/Wall painting)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation)	१०,०००	७,५००	५,०००	✓
६.	पथनाट्य (Street Play)	कोणताही नागरीक /गट/ संस्था (Any Citizen / Any Group/ Organisation)	१०,०००	७,५००	५,०००	✓
७.	सर्वोत्तम स्वच्छ हॉटेल (Best Swachh Hotel)	हॉटेल (Hotel)	१०,०००	७,५००	५,०००	✓
८.	सर्वोत्तम स्वच्छ शाळा (Best Swachh School)	शाळा (School)	१०,०००	७,५००	५,०००	✓
९.	सर्वोत्तम स्वच्छ रुग्णालय (Best Swachh Hospital)	रुग्णालय (Hospital)	१०,०००	७,५००	५,०००	✓
१०.	सर्वोत्तम स्वच्छ गृह निर्माण संस्था/ चाळ (Best Swachh Residential Welfare Association/ Mohalla)	गृह निर्माण संस्था/ चाळ (Residential Welfare Association/ Mohalla)	१०,०००	७,५००	५,०००	✓
११.	सर्वोत्तम स्वच्छ सरकारी कार्यालय (Best Swachh Government Office)	सरकारी कार्यालय (Government Office)	१०,०००	७,५००	५,०००	✓
१२.	स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आव्हान (Swachh Innovation Technology Challenge)	कोणताही नागरीक /गट/ संस्था/उद्योजक) (Any Citizen / Any Group/ Organisation)/Innovation Enterprencur	३०,०००	२०,०००	१०,०००	✓
एकुण रक्कम			**१,५०,०००/**	**१,१०,०००/**	**७०,०००/-**	

तसेच संदर्भ क्र.3 च्या निर्देशनानुसार स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आव्हान (Swachh Innovation Technology Challenge) या स्पर्धेतील विजेत्यांची नावे राज्यशासनास पाठविणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त सो.यांचेशी चर्चा करुन उपरोक्त प्रमाणे रोख बक्षिसांसाठी रु.३,३०,०००/- इतकी रक्कम निश्चित केली असुन व प्रशस्तीपत्रक, माहिती व प्रसार रक्कम रु. १,७४,५००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच मुल्यांकन करणेकामी बाह्य परिक्षक यांना मानधन अदा करणेकरिता प्रति परिक्षकांस ५,०००/- असे २ परिक्षकांस एकूण रु. १०,०००/- इतकी रक्कम अपेक्षित आहे. सदर स्पर्धा राबविण्याकरीता एकुण अंदाजीत खर्च रक्कम रु. ५,१४,५००/- असुन सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ३४०-२५७०, स्वच्छ भारत अभियान या लेखाशिर्ष अंतर्गत भागवता येईल.

तरी राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आव्हान (Swachh Innovation Technology Challenge) या स्पर्धेतील विजेत्यांची नावे राज्यशासनास पाठविणेस तसेच सदर उपक्रमास होणाऱ्या खर्चास प्रशासकिय, वित्तीय मान्यता मिळणेकामी सदर चा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

1. वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत अभियान -2 अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ वसई-विरार मिशन यशस्वीपणे राबविणेकरिता स्वच्छता स्पर्धा (Greeinowar Event-3) 2021-22 या उपक्रमास होणाऱ्या खर्चास प्रशासकिय, वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

2. स्वच्छता स्पर्धा (Greeinowar Event-3) 2021-22 अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आव्हान (Swachh Innovation Technology Challenge) या स्पर्धेतील विजेत्यांची नावे राज्यशासनास पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)

31/12/2021

प्रशासक/आयुक्त

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ९६९ — विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - ३१/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील वाघोली दैनंदिन बाजार कर वसुली कामी दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या १५ महिन्यांकरिता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर -

ई-निविदा क्र.	:-	२०२१_VVCMC_७४३३६५_१
अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ८,६०,९७८/-
प्रशासकीय मंजुरी	:-	प्रशासकिय ठराव क्र. ८२५ दि. ३०/११/२०२१
ई-टेण्डरींगद्वारे निविदा प्रसिद्धी	:-	जा.क्र.वविशम/साप्रवि/२६७४/२०२१-२२ दि. ०२/१२/२०२१ उप.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्राचे नाव व दिनांक	:-	१) दै. पुढारी दि. ०३/१२/२०२१ २) दै. नरवीर चिमाजी दि. ०३/१२/२०२१
ई- निविदा स्विकारण्याची तारीख(प्रथम लखोटा)	:-	दि. २०/१२/२०२१ दु. ३.०० पर्यंत
प्राप्त निविदाची संख्या	:-	३ (तीन)
ई- निविदा समिती मंजुरी दिनांक(व्दितीय लखोटा)	:-	दि. २८/१२/२०२१
पात्र निविदांची संख्या	:-	३ (तीन)
ई निविदा उघडल्याचा दिनांक(व्दितीय लखोटा)	:-	दि. २८/१२/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा.उप.आयुक्त सा. (दै.बा.फी)

विहित मुदतीत लखोटा क्र. १ ची पुर्तता केल्याने लखोटा क्र. २ मध्ये प्राप्त झालेले दर व निविदा धारकांची नावे खालीलप्रमाणे.

अ.क्र.	प्राप्त निविदाधारकाचे नावे	निविदाधारकाकडून प्राप्त झालेली रक्कम
१	रामकैलास यादव	८,६१,००३/-
२	बाबा कन्स्ट्रक्शन	८,६०,९८८/-
३	आफताब इन्फ्रा	८,६०,९८३/-

मा.स्थायी समिती ठराव क्र. २ दि. ०२/०५/२०२० अन्वये बाजार कर फी वसुली करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार राहील.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या १५ महिन्यांकरिता सर्वात जास्त निविदा रक्कम रु. ८,६१,००३/- अ.क्र. १ चे निविदाकार श्री. रामकैलास यादव यांचे निविदेतील दर हे इतर दोन निविदाधारकांपेक्षा जास्त असून योग्य व वाजीव असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार अ.क्र. १ चे निविदाकार श्री. रामकैलास यादव यांची जास्त दारची संविदा करणेस निविदा समिती मान्यता देत आहे. त्यांच्या समवेत करारनामा व कार्यादेश करणेस मान्यतेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय- वरीलप्रमाणे प्रस्तावात नमुद प्राप्त निविदांपैकी अनुक्रमांक ०१ मधील निविदाधारक श्री. रामकैलास यादव यांच्या निविदेतील रक्कम रु. ८,६१,००३/- हा दर इतर निविदा धारकांपेक्षा जास्त असून वाजवी असल्याने दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ या १५ महिन्यांकरिता रक्कम रु. ८,६१,००३/- ही रक्कम मंजुर करुन व त्यावर २% आयकर स्विकारुन श्री. रामकैलास यादव यांचेबरोबर संविदा करुन त्यांचे समवेत करारनामा व कार्यादेश करणेस कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आह

31/12

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १७० **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : 30 / 12/ 2019

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग क्र. 84 मधील भुईगाव आंबेडकर नगर येथे समाजमंदीर बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : - रू. 38,73,314/-

प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 17 दि. 19/02/2019

तांत्रिक मान्यता I/1001/18-19 दि. 20/02/2019

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम रू. 38,73,314/-

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/'शअ/बांध/317/19 दि. 21/08/2019 शहर अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 22/08/2019

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. लोकमत, दै. मिड डे व दै. निष्पक्ष जनसंसार

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. 01/03/2019 दु.3.00 पासून ते दि. 15/03/2019 दु. 3.00 वाजेपर्यंत

विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा :- 03

ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) दि. 27/12/2019 दु. 3.00 वाजता

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि. 22/01/2020

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- कार्यकारी तथा शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1.	मे. ईरा एंटरप्रायजेस	(+) 6.01 % कमी	--	

शासन निर्णय 27/09/2018 मधील मद्दा क्र. 4.3 नुसार दोन वेळा ई – निविदा प्रसिद्ध करून प्रतिसाद न मिळाल्यास व तद्नंतरच्या निविदा सुचनेस एकच निविदा प्राप्त झाली असल्यास तांत्रिक लिफाफा उघडण्यात यावा असे नमुद असलेनुसार तांत्रिक बाबींच्या कागदपत्रांची पूर्तता होत असल्याने एक पैकी एक निविदाकारांच्या निविदा प्राप्त ठरविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक मे. ईरा एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील 6.01% कमी दर हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे. ईरा एंटरप्रायजेस यांच्या अंदापत्रकीय दरापेक्षा 6.01% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) /(ड) नुसार शिफारस मिळणेबाबत निविदा समितीसमोर सादर.

निर्णय :- उपरोक्त कामी शासन निर्णय 27/09/2018 मधील मद्दा क्र. 4.3 नुसार दोन वेळा ई – निविदा प्रसिद्ध करून प्रतिसाद न मिळाल्यास व तद्नंतरच्या निविदा सुचनेस एकच निविदा प्राप्त झाली असल्यास तांत्रिक लिफाफा उघडण्यात यावा असे नमुद असलेनुसार तांत्रिक बाबींच्या कागदपत्रांची पूर्तता होत असल्याने एक पैकी एक निविदाकारांच्या निविदा प्राप्त ठरविण्यात येत असून मे. ईरा एंटरप्रायजेस यांच्या अंदापत्रकीय दरापेक्षा 6.01% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(क) अन्वये मा. आयुक्त साो. यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी महानगरपिालकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करून संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक साो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ८७१

विभाग :- वाहन
दिनांक ३१/३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या त्रैवार्षिक वर्षासाठी महानगरपालिकेच्या मालकिची वाहने दुरुस्ती करण्यास सुधारित प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका मालकिची ९ प्रभाग समिती मधील विविध विभागांमध्ये एकूण ४८ वाहने कार्यरत होती. (घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील टिपर, कॉम्पॅक्टर तसेच अनिशमन विभागाकडील वाहने वगळून). सदर वाहनांची वेळोवेळी दुरुस्ती करणे आवश्यक होते. करिता सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ ह्या वर्षाकरिता वाहने दुरुस्ती करणेकामी संदर्भ क्र. १ अन्वये मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३ दि. २०/०२/२०२० अन्वये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी रक्कम रु.५२.८० लक्ष सन २०२१-२२ १०% वाढ धरुन रक्कम रु.५८.०८ लक्ष सन २०२२-२३ १०% वाढ अपेक्षित धरुन रक्कम रु.६३ लक्ष ८८ हजार असे एकूण र. रु. १,७४,७६,०००/- रकमेस संदर्भ क्र. १ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली होती.

देशात कोव्हिड-१९ चा वाढता प्रादूर्भाव पाहता वैद्यकिय आरोग्य विभागाच्या मागणीनुसार वाहन विभागामार्फत शासनाच्या जी.ई.एम पोर्टलवरुन २३ नग महिंद्रा सुप्रो एल एक्स, ४ फोर्स रुग्णवाहिका, अग्निशमन विभागाकडील २ नग सी टाईप कार्डीएक ॲम्ब्युलन्स, ४ नग बी टाईप ॲम्ब्युलन्स अशा एकूण ३३ नवीन रुग्णवाहिका खरेदी करणेत आलेल्या आहेत. तसेच दिवाबत्ती, अतिक्रमण, नगररचना तसेच इतर विभागासाठी २२ बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७ T व ४ नग महिंद्रा बोलेरो कॅम्पर वाहने नव्याने खरेदी केलेली आहेत. तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नव्याने ५ नग एक्सकेवेटर्स, ५ मैला टँकर व ५ ट्रॅक्टर खरेदी केलेले आहेत. यामधील काही वाहनांचा हमी कालावधी संपुष्टात आलेला आहे. तर बहुतांश वाहनांचा हमी कालावधी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात संपुष्टात येणार आहे. करिता सदर वाहन दुरुस्तीचे काम मंजूर वार्षिक ठेकेदराकडून करुन घेणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिका मालकिच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील घनकचरा संकलन करणाऱ्या महापालिका मालकिचे कॉम्पॅक्टर व टिपर असे एकूण १२५ वाहनांची दुरुस्ती वाहन विभागाच्या मंजूर ठेकेदारामार्फत करुन मिळणेबाबत संदर्भ क्र. ४ अन्वये पत्र देऊन कळविलेले आहे.

सन २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ या वर्षासाठी महापालिका मालकिची वाहने दुरुस्त करणेकामी संदर्भ क्र. १ अन्वये र.रु. १,७४,७६,०००/- रकमेस मंजूरी घेण्यात आलेली होती. परंतु वाहने व यंत्रसामुग्रीत वाढ झाल्यामुळे वाहनांच्या दुरुस्तीपोटी होणाऱ्या खर्चात वाढ होणार आहे. करिता नव्याने खरेदी केलेल्या वाहनांच्या दुरुस्तीपोटी खालीलप्रमाणे खर्च आवश्यक आहे.

तक्ता - क्र. १

अ.क्र.	वाहन / यंत्रसामुग्री प्रकार	वाहन संख्या	अंदाजित खर्च
१	रुग्णवाहिका	३३	६६,५०,०००/-
२	बोलेरो	०३	४,८०,०००/-
३	बोलेरो पिकअप	१८	२८,२०,०००/-
४	कॅम्पर	४	६,४०,०००/-
५	ईको	१	४५,०००/-
६	कॉम्पॅक्टर	५५	१,९२,५०,०००/-
७	टिपर	७०	१,४०,००,०००/-
८	मैला टँकर	११	६,५०,०००/-
९	ट्रॅक्टर	५	१,५०,०००/-
१०	एक्स्केवेटर्स (पोकलेन)	५	३०,००,०००/-
	एकूण	२०५	४,७६,८५,०००/-

तसेच यापूर्वी भाडे तत्वावर घेण्यात येणाऱ्या वाहनांचा खर्च खालीलप्रमाणे आहे.

तक्ता - क्र. २

अ.क्र.	वाहन / यंत्रसामुग्री प्रकार	वाहन संख्या	प्रस्तावित दुरुस्ती खर्च (वार्षिक)	भाडयाची वाहने	होणारा खर्च (वार्षिक)
१	रुग्णवाहिका	३३	६६,५०,०००/-	२१ रिक्षा	१,४५,७८,२००/-
२	बोलेरो	०३	४,८०,०००/-	११ एन्जॉय	१०८९६६००/-
३	बोलेरो पिकअप	१८	२८,२०,०००/-	२५ टाटा एसई टेम्पो	२,२२,३०,०००/-
४	कॅम्पर	४	६,४०,०००/-		
५	ईको	१	४५,०००/-		
६	एक्स्केवेटर्स (पोकलेन)	५	३०,००,०००/-	३ पोकलेन १ डोझर	२,८२,००,०००/-
	एकूण	६४	१,३६,३५,०००/-	६१	७,५९,०४,८००/-

तरी तक्ता क्र. २ चे अवलोकन केले असता महापालिकेने वाहने खरेदी केलेनंतर दुरुस्तीपोटी होणारा खर्च हा कमी आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक बचत होत आहे.

उपरोक्त तक्ता क्र. १ मध्ये नमुद केलेली अ.क्र. १ ते १० मधील (अ.क्र. ६ व ७ वगळून) वाहने हमी कालावधी नंतर सन २०२१-२२ तर काही वाहने सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात नादुरुस्त झाल्यास वाहन विभागाकडील मंजूर ठेकेदार मे.के.एल.एंटरप्रायजेस यांच्याकडून दुरुस्ती करुन घ्यावी लागणार आहेत. तसेच अ.क्र. ६ व ७ मधील वाहने मे. के.एल. एंटरप्रायजेस यांचेकडून मंजूर दरानुसार दुरुस्ती करावयाचे झाल्यास व त्याकामी होणारे देयक परस्पर स्वच्छता विभागाकडील संबंधित ठेकेदार यांचेकडून अदा होणार आहे. परंतु मे. के.एल.एंटरप्रायजेस यांचेकडून संबंधित होणाऱ्या रकमेची स्टॅम्प ड्युटी व सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

करिता मे. के.एल.एंटरप्रायजेस यांचेकडून वाहने देखभाल व दुरुस्ती करणेकामी संदर्भ क्र. १ अन्वये प्राप्त झालेल्या र.रु. १,७४,७६,०००/- इतक्या रकमेस व महापालिकेने नव्याने खरेदी केलेल्या तक्ता क्र. १ मधील वाहनांच्या दुरुस्तीपोटी होणाऱ्या प्रस्तावित अंदाजित र.रु. ४,७६,८५०००/- असे एकूण ६,५१,६१,०००/- रकमेस सुधारित प्रशासकिय मान्यता घेऊन संबंधित मंजूर ठेकेदार यांचेकडून स्टॅम्प ड्युटी भरणे आवश्यक आहे.

तरी सन २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तीय वर्षात होणाऱ्या र.रु. ६,५१,६१,०००/- इतक्या अंदाजित खर्चास सुधारित प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

ठराव निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका मालकिची वाहने देखभाल-दुरुस्ती करणेकामी सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३, दि. २०/०२/२०२० अन्वये र.रु. १,७४,७६,०००/- इतक्या रकमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी प्राप्त झालेली होती. परंतु, महानगरपालिकेने नव्याने खरेदी केलेली वाहने व यंत्रसामुग्रीच्या देखभाल-दुरुस्तीपोटी सन २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता अंदाजित र.रु.४,७६,८५,०००/- इतका खर्च आहे. करिता सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३, दि. २०/०२/२०२० अन्वये प्राप्त झालेल्या र. रु. १,७४,७६,०००/- व नव्याने खरेदी केलेल्या वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीपोटी अंदाजित र.रु ४,७६,८५,०००/- असे एकूण ६,५१,६१,०००/- इतक्या अंदाजित रकमेस सुधारित प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 972 विभाग :- वैद्यकीय आरोग्य
दिनांक : 31/12/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई येथिल कौलसिटी या रुग्णालयातील डायलेसिस विभागाकरिता आवश्यक साहित्य विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत कौलसिटी रुग्णालयात कान, नाक व घसा व नेत्रचिकित्सा विभाग सुरु करण्यात आला असुन डायलेसिस विभाग सुरु करण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याने डायलेसिस मशिनकरिता संदर्भ क्र.२ नुसार FRESENIUS या उत्पादित कंपनीचे डायलेसिस मशिन (Model-4008S, Without BPM) पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आला असून सदर ठिकाणी १० नग डायलेसिस मशिन उपलब्ध झालेले आहेत. यानुसार रुग्णांना उत्तम दर्जाची सेवा देणेकरिता संदर्भ क्र.३ अन्वये कौलसिटी रुग्णालय येथील फार्मासिस्ट व नियंत्रण अधिकारी यांनी सदर डायलेसिस विभागाकरिता आवश्यक साहित्य मिळणेबाबतची मागणी केलेली आहे. सदरचे डायलेसिस विभागाकरिता लागणारे साहित्य वार्षिक ई-निविदेत समाविष्ट नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. याकामी मे. श्री गजानन मेडीकल स्टोअर्स, विरार (प.) यांच्यामार्फत डायलेसिस विभागाकरिता लागणाऱ्या साहित्यांचे दर प्राप्त झाले आहेत. सबब सदर दरांबाबत वाटाघाटी करणे गरजेचे असल्याने सदरच्या दरांबाबत वाटाघाटी करण्यात आली. यानुसार दि.०२/१२/२०२१ रोजीच्या वाटाघाटीनंतर प्राप्त झालेल्या दरांसह तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	साहित्याचे नाव	पॅकिग	दर (सर्व करांसहित)	वाटाघाटी अंती दर	मागणी	एकुण खर्च
१	Citro Sterile	5 lit	5256.90	5151.76	50	257588
२	Formalin Solution	5 lit	637.20	624.46	10	6244.6
३	Dialyser F6	1	822.15	805.71	1000	805710
४	Digital Weight Machine	150kg	19116	18733.68	1	18733.68
५	Inj.Erthropoetin 10000IU	1	801.92	785.88	500	392940
६	Inj.Erthropoetin 4000IU	1	347.20	340.26	500	170130
७	Dialysis Machine Protector	1	13.61	13.34	1000	13340
८	ON/OFF Kit (Cotton/Gauze/ Absorbant)	1	39.31	38.53	2000	77060
९	Diasafe Filter	6mm	6053.40	5932.33	24	142375.92
१०	Bicarb Mixer Machine with TDS Monitor	1	143370	140502.30	1	140502.3
					Total	Rs.20,24,624.5/-

वरील तक्त्यात नमुद डायलेसिस विभागाकरिता आवश्यक साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारान्वये मे.श्री गजानन मेडीकल स्टोअर्स, विरार (प.) यांचेकडून खरेदी करणे कामी निर्णय घेणे आवश्यक आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई येथिल कौलसिटी रुग्णालयातील डायलेसिस विभागाकरिता आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी रु.२०,२४,६२५/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाकरीता "रुग्णालय इतर साहित्य खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मे.श्री गजानन मेडीकल स्टोअर्स, विरार (प.) यांचेकडून डायलेसिस विभागाकरिता प्राप्त झालेले वरील साहित्य खरेदीचे दर कमी असल्याने सदरचे दर मंजुर करण्यांत येत असून याकामी पुरवठा आदेश निर्गमित करणेस तसेच सदरची सेवा अत्यावश्यक असल्याने वेळोवेळी आश्यकतेनुसार वरील नमुद मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरारपुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ९७३ विभाग :-वाहन

दिनांक :-३१/१२/२०२१

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांची दुरुस्तीअंती निकामी झालेले स्पेअर पार्टस् विक्री करणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभागामधील विविध विभागामध्ये कार्यरत असलेली विविध प्रकारची महानगरपालिकेच्या मालकीच्या एकुण ४८ वाहने आहेत.(घनकचरा विभागाकडील कॉम्पेक्टर व टिपर, अग्निशमन विभागाकडील वाहने वगळुन) सदर वाहनांची दुरुस्ती वाहन विभागाचे मंजुर ठेकेदार मे. के. एल. एंटरप्रायजेस, वसई यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. करिता वाहनांच्या दुरुस्तीअंती निकामी झालेले स्पेअर पार्टस् विक्री करणे आवश्यक आहे. तसेच महापालिका मालकीच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डोझर कार्यरत असुन सदर यंत्रसामुग्रीची दुरुस्तीही वेळोवेळी करण्यात येत असल्यामुळे तेही निकामी स्पेअर पार्टस् डंम्पिंग ग्राऊंड येथे ठेवण्यात आलेले आहेत. यापूर्वी ट्रॅक्टर दुरुस्तीचे काम मे. अरुणा ट्रॅक्टर गॅरेज येथे करण्यात येत होते. या वाहनाचे स्पेअर पार्टस् देखील त्याठिकाणी ठेवण्यात आलेले आहेत. सदर निकामी स्पेअर पार्टस् ची दरपत्रके मागवून विक्री करणे आवश्यक आहे. जेणेकरुन निकामी स्पेअर पार्टस् ची विक्री करुन महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल. कारण हे स्पेअर पार्टस् एकाच जागी सतत पडून राहील्यामुळे त्यांची झिज होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कता स्पेअर पार्टस् चे अंदाजित विक्री रक्कम खालीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील/ठिकाण	अंदाजित रक्कम
१	मे. के. एल. एंटरप्रायजेस वसई गॅरेज	रु. १२,०००/-
२	डंम्पिंग ग्राऊंड	रु. ९०,०००/-
३	फुलपाडा डॅम	रु. १५,०००/-

उपरोक्त प्रमाणे स्पेअर पार्टस् ची विक्री दरपत्रक मागवून करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका मालकीची वाहने व यंत्रसामुग्रीची दुरुस्ती हि मंजुर निविदाकार यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. वाहने व यंत्रसामुग्री यांची दुरुस्ती करतेवेळी निकामी झालेले स्पेअर्स पार्टस् यांची विक्री करणेस महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

प/107

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ८७४ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ३०/१२/२०२१

---

१)प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षत्रातील प्रभाग समिती 'सी' विरार (पू) प्रभाग क्र.२१ मध्ये परेरावाडी समोरील नाल्यावर स्लॅब टाकणे व मार्केट शेड बनविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.६०,७१,९६९/-
प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२९, दि.८/८/२०१९
तांत्रिक मान्यता व अंदाजत्रकीय रक्कम :- मा.शहर अभियंता, दि.३१/०८/२०१९ रु.६०,७१,९६९/-
जाहिर निविदा सुचना :- १) दै.इॅकोनॉमिक टाइम्स
२) दै .खबरे आज तक
३) दै.लोकमत
४) दै.मिड डे

ई-निविदा प्राप्त :- दि. १५/०९/२०१९
ई-निविदा उघडल्या [प्रथम लखोटा] :-दि. ३१/१०/२०१९
[द्वितीय लखोटा]:- दि.३१/१२/२०१९
प्राप्त निविदांची संख्या :- २
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा.शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षो	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन	६.०० % जास्त दराने	--	L२
२.	मे. वाय.एम.एंटरप्रायजेस	-९.००% कमी दराने	००७६७९ ०४/०१/२०२०	L१

प/१०७

उपरोक्त निविदांची तुलना करता मे. वाय.एम.एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी दराची सर्वात कमी व वाजवी आहे. उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. वाय.एम.एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी हा दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

सदर विषयावर दि. १४/०१/२०२० रोजीच्या निविदा सभेत सविस्तर चर्चा करणेत आली असता वाय.एम.एंटरप्रायजेस यांच्या अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी निविदेस शिफारस करणेत आलेली आहे. तसेच अंदाजपत्राकापेक्षा कमी दराची निविदा असल्याने मे. वाय.एम.एंटरप्रायजेस यांचे मार्फत सदर कामासाठी रु.६०,७२०/- रक्कमेचा परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष क्र. ००७६९ व्दारे दि. ०४/०१/२०२० रोजी मनपा फंडात जमा करणेत आलेला आहे. तरी मे. वाय.एम.एंटरप्रायजेस यांच्या अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्या बरोबर संविदा करण्यांस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

ठराव :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया मे. वाय.एम.एंटरप्रायजेस यांच्या अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी दराची निविदा लघूत्तम असून या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देऊन त्या संबंधित पुढील कार्यवाहीस मंजुरी देत आहे.

16/1/2

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ७७५ विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - 30/12/2021

प्रस्तवाचा विषय - प्रभाग समिती (ब) तुळींज मोरेगांव बजरंग नगर परिसरात १५० मी.मी. व्यासाची १३० मीटर लांब जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरणे

प्रस्तवाचा मजकूर - उपरोक्त विषयान्वये प्रभाग समिती (ब) अंतर्गत तुळींज परिसरात मोरेगाव येथे अमृत योजनेतंर्गत जलकुंभा बांधुन लगत मुख्य व वितरण जलवाहीनी अंथरण्याचे काम करण्यात आले आहे. तुळींज मोरेगांव बजरंग नगर परिसरातील लोक खाजगी टँकर, बोअरवेल वरुन पाणीपुरवठ्याची गरज भागवित आहेत. महापालिकेमार्फत नळ कनेक्शन द्वारे पाणीपुरवठयाची सोय करावयाची असल्यास परीसरात वितरण जलवाहिनी अस्तित्वात नसल्याने नव्याने वितरण जलवाहिनी अंथरावी लागणार आहे. याकामी पाणीपुरवठा अभियंता यांनी प्रत्यक्ष विभागाचे सर्वेक्षण केले आहे त्याअनुषंगाने मोरेगांव जलकुंभातुन तुळींज व मनवेलपाडा विभागात पाणीपुरवठा करणाऱ्या ३५० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनी वरुन बजरंग नगर परिसरात शारदा अपार्टमेंट परिसरात १५० मी.मी. व्यासाची १३० मीटर लांब जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरुन अतर्गत जोडणी केल्यास या भागातील इमारतींना / चाळींना पाणीपुरवठा पुरेश्या दाबने करता येईल. याकामी वरील ठिकाणी जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च
१	प्रभाग समिती (ब) तुळींज मोरेगांव बजरंग नगर परिसरात १५० मी.मी. व्यासाची १३० मीटर लांब जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरणे	रू.२,९८,९५८/-

प्रभाग समिती (ब) तुळींज मोरेगांव बजरंग नगर परिसरात १५० मी.मी. व्यासाची १३० मीटर लांब जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरणे कामी होणा-या रक्कम रू. रू.२,९८,९५८/- इतकया खर्चास प्रशाकिय व वित्तीय मान्यते साठी प्रस्ताव सादर.

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (ब) तुळींज मोरेगांव बजरंग नगर परिसरात १५० मी.मी. व्यासाची १३० मीटर लांब जलवाहिनी स्पेशल साहित्यसह पुरविणे व अंथरणे कामी महानगरपालिका अधिनियमाचे कमल ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
परिमंडळ-१
वसई-विरार शहर महानगरपालिका